फाल्गुन, शके १८२३.

घटकाभर करमणूक-१२.

कृष्णदेव यादव.

गरीब बिचारी पार्वतीबाई.

रजपुताचा अभिमान.

रचणार,

हरि नारायण आपटे.

प्रकाशक,

बाबाजी सखाराम आणि कंपनी,

[illegible]ई.

पुढील सालच्या वर्गणीदारांस

एक मोठी सवलत.

मराठी पुस्तकांचा संग्रह करण्यास उत्तम संधी.

मराठी भाषेतील प्रसिद्ध लेखकांचे उत्तम ग्रंथ सर्वांस थोडक्यांत सवडीनुसार घेतां यावे ह्मणूनच आह्मीं ही सवलतीची व्यवस्था केली आहे. धडकाभर करमणुकीचे १२–२४ पुस्तकांकरितां आगाऊ रु. २ दिले असतां आमचीं पुढें दिलेलीं पुस्तकें ता. ८।५।१९०२ पर्यंत कमी किमतीनें देण्याचें ठरविलें आहे. एकदां सदरील प्रमाणें वर्गणी भरून नंतर वरील मुदतींत केव्हांही पुस्तकें मागविलीं असतां सवलतीचे दरानें मिळतील. विशेष माहितीकरितां करमणूक पत्राचे १० वे अंकाबरोबर वाटलेली पुरवणी पहा. पुस्तकांची यादी कव्हर पेज ३ वर दिली आहे.

बाबाजी सखाराम आणि कंपनी,

मुंबई.



पृष्ठ १७ पहा.

कृष्णदेव यादव.

रामदेवरावाची भाची मायादेवी सुमारें नऊ वर्षांची असेल, परंतु तिजवर रामदेवराव जीव कीं प्राण करीत असे; कां कीं, त्याची बहीण यशोदादेवी इनें आपण सती ह्मणून इहलोक सोडून जाते वेळीं त्या लहान बालकास त्याच्या पदरीं घालून "इचा बाप तुझ्याचबरोबर लढाईंत लढत असतांना वारला. त्यानें वैकुंठप्राप्ति केली. आतां मी सहगमन करून मीही त्यांच्या चरणापाशीं तें अढळपद मिळविणार. तुझीं मुलें आहेत त्यांतच माझी मुलगी धर. एक तर कोणीकडे टाकूनच दशदिशा जावं लागलं. एवढी उरली आहे ती तुझ्या पदरांत घालतें, संभाळ." असें ह्मटलें व "धन्य माउली! दुसरी सुलोचनाच ही!" असें लोक ह्मणतां ह्मणतां ती चिता प्रवेश करिती झाली. ते दिवसापासून रामदेवराव तिच्या एकुलत्या एका मुलीवर आपल्या पोटच्या मुलांपेक्षांही अधिक प्रेम करूं लागला, आणि ती गुणांनीं व रूपानें सुंदर मुलगी त्या प्रेमास पात्र होती. एके दिवशीं तिसरे प्रहरीं मायादेवी देवगिरीवरून खालीं उतरून खालच्या रम्य प्रदेशांत हिंडण्याचा हट्ट धरून तिच्या तैनातीस असणाऱ्या दासदासींसह खालीं आली आणि हिकडून तिकडे हिंडत होती. हिंडतां हिंडतां पलीकडे एका झाडाखालीं बसलेल्या एका मुलाकडे तिचें लक्ष्य गेलें. हा मुलगा अतोनात दीनवाण्या स्थितींत बसलेला असून त्याच्या गालांवरून घळघळां

अश्रु गळत होते असें दिसलें. त्याचें वय सुमारें बारा वर्षांचें असेल नसेल. मायादेवी लहान, परंतु त्या मुलाला पाहण्याबरोबर तिच्या मनाला द्रव आला, आणि ती एकदम त्या मुलाकडे धांवत गेली. ती जात्याच दृढनिश्चयी, किंबहुना दुराग्रही असल्यामुळें ह्मणा, किंवा अगदीं लहानपणापासून तिच्या मनांत जें जें येईल, तें तें रामदेवराव तिला खुशाल करूं देत गेल्यामुळें ती फार स्वेच्छ झाली ह्मणून ह्मणा; पण तिच्या मनांत एखादी गोष्ट आली कीं, मग ती कधीं कोणाचें ऐकायची नाहीं. तिच्या मनांत येईल तें ती करणारच. तिच्या मनांत मात्र आलें पाहिजे. या तिच्या स्वभावास अनुसरून तिनें लागलीच त्या झाडाकडे धांव मारली. आणि जाऊन त्या मुलाच्या खांद्यावर हात टाकून त्यास फार दयार्द्रपणें विचारलें, "मुला, तुझं नांव काय? तूं असा कां रडत बसलास?" आपण दुःखित असतां जवळ जवळ समवयस्क अशा व्यक्तीनें जवळ येऊन मोठ्या काकळुतीनें आपणास कांहीं विचारलें, ह्मणजे जो आनंद होतो, तो खरोखर वर्णन करून सांगतां येण्याजोगा नसतो. त्या आनंदाच्या भरांत अश्रु अधिकाधिकच वाहूं लागतात, त्याचप्रमाणें त्या मुलाची स्थिति झाली. रामदेवासारख्या राजाची मुलगी आपल्याजवळ येऊन आपल्या खांद्यावर हात टाकून आपल्याशीं प्रेमानें आपकी विचारपूस करते आहे, हें पाहतांच त्याला अधिकच गहिंवर आला आणि तो पहिल्यापेक्षां अधिक अश्रू ढाळूं लागला. पुनः तिनें त्याला विचारलें, "मुला, तुझं नांव काय? तूं बोलत कां नाहींस?"

" माझं नांव कृष्णदेव. मला कोणी नाहीं. रामदेव-रावांच्या पदरीं हुजऱ्या होऊन रहावं ह्मणून मी आलों आहें. परंतु त्यांची कोणी गांठ पडूं देत नाहींत. जो तो धुडकावून लावतो."

" हो का? मग मी तुला पाहिलं तें फार चांगलं झालं; मी तुझीन् त्यांची गांठ घालून देतें. मला तूं फार आवडतोस." असें ह्मणून तिनें त्याला एक-दम मिठी मारली. मायादेवीच्या दासदासींनीं तें पाह-तांच त्यांस अगदीं 'शांतं पापं' 'अब्रह्मण्यं' झालें. त्यांतली मुख्य दासी तर एकदम धांवत येऊन " हं, हें काय हें बाईसाहेब, आपण कोण, तो भिकारडा पोरगा कुठला, त्याचे कपडे काय? आणखी तुह्मी त्याला मिठ्या मारतां? चला, चला, सोडा त्याला. ऊठ रे मेल्या, इथें तुला कोणीं यायला सांगितलं? उठून चालता होतोस का कांहीं तरी घालूं बोडक्यांत तुझ्या!" असें ह्मणाली. झालें. मायादेवीला तेवढेंच पुरवलें. तिला कोणी, आणि त्यांतून तिच्या तैनातीस असलेल्या दासदासींनीं कांहीं करूं नको ह्मटलें, कीं मग झालें. तें हटकून करण्याबद्दलचा तिचा हट्ट दसपट वाढलाच ह्मणून समजायचा. त्या मुख्य दासीनें त्या मुलाला शिव्या दिल्या, आणि त्याच्याशीं बोलूं नको ह्मणून सांगितलें. एवढें तिच्या हट्टाला जागृत होण्याला अगदीं रगड कारण झालें, आणि ती त्यास

अधिकाधिकच मिठ्या मारूं लागली. त्याच्या खांद्यावर तिनें आपली मान टाकली, आणि त्या दासीस ती संतापून शिव्या देऊं लागली. सर्व दासी जमल्या, आणि मायादेवीच्या या आचरटपणापासून तिला परावृत्त करून त्या पोराला हांकून देण्याकरितां त्यांनीं खटपट चालविली. त्यांत एक विशेष धीट होती. तिनें तर पुढें होऊन मायादेवीचे हात सोडवून तिला उचलून धरलें आणि दुसरीनें त्या गरीब मुलास दोन तीन धप्पे मारून तेथून हांकून दिलें. तें पाहतांच मायादेवीच्या आक्रोशास आणि आतत्यायीपणासही मुळींसुद्धां आळा राहिला नाहीं. तिनें हात पाय आपटले. ज्या दासीनें तिला सोडवून उचलून आणिलें, तिच्या हाताला तर ती कडकडून चावली; परंतु थोरांच्या थोरपणास योग्य कोणचें आणि अयोग्य कोणचें, याबद्दल त्यांच्या चाकरमाणसांस जितकी दिक्कत असते, तितकी त्यांना स्वतःला नसते. या न्यायाला अनुसरून मायादेवीच्या दासदासींनीं तिच्या आक्रंदनाला मुळींच न जुमानतां तिला त्या मुलापासून दूर चालविलें. आणि एका चाकरानें त्या मुलाला दूर घालविलें. मायादेवीचा जीव लहान यामुळें तिचा इलाज नाहींसा झाला. तिच्या हट्टाप्रमाणें जर का तिचा जीव असता, तर तिनें त्या चाकरांनोकरांची चांगलीच त्रेधा उडविली असती. तिचा इलाज चालेना यामुळें तिला ते नेतील तिकडे जावें लागलें. पण तिनें वाटेनें आक्रोश मात्र अतोनात चालविला.

कर्मधर्मसंयोगानें रामदेवराव त्याच वेळीं कोणीकडून त्या ठिकाणीं आला. मायादेवीचा रडण्याचा स्वर ह्मणजे त्यास अत्यंत दुःख देणारी एक गोष्ट होती. यामुळें त्याच्या देखत ती रडेल असें कांहीं घडूं देणें ह्मणजे आपल्या चाकरीवरच काय, पण जीवावरही पाणी सोडण्यासारखें आहे, असें प्रत्येक नोकरास वाटून तो प्रसंग ते नेहमीं टाळीत. परंतु आज तो टळला नाहीं. तिला रडतांना ऐकतांच रामदेवराव आपली नित्याची शांतता अगदीं विसरला. " कायरे, कोण आहेत ते, कोण त्या पोरीला रडवताहेत? ये, काय झालं? काय कोणी केलं तुला? सांग. मी त्याचा........" असें ह्मणून त्यानें एकदम तिला आपल्या पोटाशीं धरलें. त्या दासदासींस आतां अगदीं पक्कें वाटलें, कीं आपलीं पुरीं शंभर वर्षें भरलीं. मायादेवीला रडविण्यापेक्षां दुसरा कोणचाही अपराध अधिक भयंकर नव्हता. त्या सर्व बिचाऱ्या थरथरा कांपत उभ्या राहिल्या होत्या, आणि मायादेवीचे हुंदके कांहीं केल्या न आवरून ती नीट बोलेना; तथापि " मामा, मामा, कनी, तो मुलगा कांहीं वाईट नाहीं हो. अगदीं चांगला आहे. तुह्मी त्याला आणवा. मला तो पाहिजे. आधीं आणवा. यांनीं त्याला मारलं. यांना तुह्मी मारा." असें हुंदक्या हुंदक्याच्या दरम्यान् एक एक शब्द उच्चारून तिनें रामदेवरावास सांगितलें.

"काय आहे? ही काय ह्मणते आहे? कुठला मुलगा?" रामदेवरावानें संतापून डोळे लाल करून विचारलें.

त्या संतप्त पाहण्यानें त्या दासदासींना तर अगदीं आतां आपण जळून खाक होतों असेंच वाटलें; तथापि स्वतःची बाजू मांडली असतां कांहीं बचाव झाल्यास पहावें असें वाटूनच काय, ती मुख्य दासी तोंड उघडून "सरकार, तो भिकारडा........"

परंतु मायादेवी तिला पुढें बोलूं देणार कुठली? ती लागलीच ओरडून ह्मणते, "मामा नाहीं हो तो भिकारडा! तो खरोखर चांगला आहे, मला तो माझ्याशीं खेळायला पाहिजे. तुह्मीं त्याला आधीं आणा. त्याला यांनीं मार-मारून घालविला. आधीं आणा. मामा, त्याला आधीं आणा."

रामदेवराव देवगिरीच्या सभोंवार शें दोनशें योजनांवर आपला अंमल बजावी, परंतु मायादेवी त्याच्याही मनावर अंमल गाजवी असें ह्मटलें तर शोभणार आहे. त्यानें लागलींच त्या दासदासींना "आणा आधीं कोणचा मुलगा तो, त्याला घेऊन या. जा," असें ह्मणून लावून दिलें आणि आपण मायादेवीची समजूत घालूं लागला. आपल्या ह्मणण्याप्रमाणें मामानें त्या मुलाला बोलावणें पाठविलें आणि आतां तो येणार, हें पाहतांच तिला फार समाधान झालें. रामदेवरावानें तिला आपल्या बरोबर घेऊन व "तो कोण मुलगा तो आला ह्मणजे त्याला गडावर

घेऊन या " ह्मणून हुकूम देऊन स्वारी मायादेवीच्या आतां मृदु मधुर अशा भाषणाचें कौतुक करीत व तिला उगी करीत तो गड चढून वर चालला. परंतु मायादेवीचें सर्व लक्ष्य त्या मुलाकडे लागलें होतें. तो मुलगा येईल केव्हां, आणि आपण आपल्या मामाकडून त्याला गडावर ठेवून घेऊं केव्हां असें तिला झालें होतें. नादी आणि लाडावलेल्या अशा मुलांचा अनुभव ज्यांना असेल, त्यांना तिच्या त्या करण्याचें मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. वाटेनें जातां जातां तिनें एक पंचवीस वेळां विचारलें असेल कीं, " तो मुलगा आला कीं नाहीं."

इकडे ती नोकरमंडळी त्या मुलास शोधण्यासाठीं गेल्याला किती तरी वेळ झाला. त्यांस तो कोठेंच सांपडेना. आणि त्याला शोधून आणण्याची त्यांस तादृश उत्सुकता नव्हती; परंतु रामदेवरावाचा स्वभाव किती कडक होता हें प्रत्येकास माहित असल्यामुळें त्या मुलावांचून परत जाणें ह्मणजे आपल्या जीवावर संकट ओढून आणणें होय हें जो तो जाणत होता. त्यांत आणखी हें काम त्या नादी पोरीच्या नादामुळें झालेलें. मग काय विचारतां? हरतऱ्हा करून त्यांनीं त्या मुलाला शोधून तर काढलें. आणि तुझ्यामुळें आह्मांला एवढा त्रास झाला असें ह्मणत, त्याजवर संतापून त्याला धक्केबुक्के देत त्यांनीं वर आणलें. मुलगा बिचारा लहान. त्यांत त्याला आज दोन दिवसांत कांहीं पुरतेंसें खाण्याला मिळालेलें नव्हतें,

आणि तशांत या गुलामांची ही अशी वागवणूक. मग काय विचारतां? देवगिरी-दौलतबादचा-किल्ला ह्मणजे कसला दांडगा! ज्याच्या पोटांत दोन दिवसांत पुरतेंसें अन्न नाहीं अशा मुलाच्यानें तो गड काय चढवणार? परंतु या चाकरमाणसांना कुठली आली आहे त्याची एवढी काळजी! भिकारड्याला केवढं महत्त्व आलं आहे पहा! असें ह्मणह्मणून व त्याला दरडादरडावून त्यांनीं पुढें घालून नेलें. आणि मुख्य हुजऱ्यानें त्यास रामदेवरावाच्या पुढें उभा राहून दंडवत् घालण्याविषयीं दरडावलें. थोरांचे नोकर पिसें लावलेल्या डोमकावळ्यांप्रमाणें असतात. त्यांच्या धन्यांच्या डामडौलांपेक्षां त्यांचा स्वतःचा दिमाखच फार असतो. रामदेवराव एक अक्षरसुद्धां अद्यापि बोलला नाहीं; परंतु नमस्कार कसा करावा, कोणाला करावा याची माहिती नसल्याबद्दल आणि नीट उभें राहण्याबद्दल दरडावणी हुजऱ्यांच्या मुकादमाची. असो.

त्या मुलास पहाण्याबरोबर मायादेवी एकदम हंसून टाळ्या पिटूं लागली. आणि एकदम ह्मणते, "पहा, पहा हो मामा, आहे काहो हा वाईट? गरीब असला ह्मणून काय झालं हो. तुह्मींच पहा. कनी मामा, मला हा खेळायला गडावर पाहिजे आहे. तुह्मीं याला अगदीं ठेवून घ्या."

"कोणरे तूं? कोणाचा? इकडे कोणीकडे आला होतास?" रामदेवरावानें आपल्याकडून हे सर्व प्रश्न मोठ्या सौम्य रीतीनें विचारले होते; परंतु तो मुलगा त्या हुज-

त्यांच्या दरडावण्यानें, चढण्याच्या श्रमानें आणि रामदेवराव तरी काय करणार कोणास ठाऊक असें वाटल्यानें अगदीं घाबरून गेला होता. पण तितक्यांतल्या तितक्यांत त्यानें धैर्य धरून उत्तर दिलें, "मी आपल्या पदरीं कांहीं नोकरी मिळाली तर पहाण्यासाठीं आलों होतों. पण दोन दिवसांत कोणी...." पुढें त्याच्या तोंडून एकही शब्द न निघतां तो एकदम धाडकन् खालीं पडला आणि बेशुद्ध झाला. त्यास ग्लानि आली. रामदेवरावानें झट्कन् पुढें होऊन त्यास उचललें. त्या मुलाचा चेहरा पहातांच, व त्यानें उच्चारलेले ते चार शब्द कानीं पडतांच रामदेवरावास कांहीं चमत्कारिक वाटूं लागलें होतें. तें काय वाटत होतें, हें त्याचें त्यालाच समजेना. त्यानें मुलास तशा त्या निपचित स्थितींत उचलून धरल्याबरोबर तर तें त्याचें चमत्कारिक वाटणें अधिकच वाढलें. यजमानांनीं स्वतः त्या मुलास उचललें असें पहातांच मग चाकरांनोकरांच्या धांदलीस काय पारावार! कोणी वैद्यबोआंना बोलावण्यास, कोणी पाणी आणण्यास, कोणी यजमानाच्या हातून त्यास घेण्यास धांवले. परंतु तितक्यांना गप्प बसण्याविषयीं रामदेवरावानें इषारा करून त्या मुलास पलीकडे एक पलंग होता त्या पलंगावर ठेवून त्याच्या तोंडावर पाणी वगैरे मारलें. मुलगा थोड्याच वेळांत सावध झाला; परंतु त्याचे पोटांत कांहीं नसल्यामुळें त्यानें "भूक लागली," असे शब्द पांच चार वेळां उच्चारले. राजगृहांत खाण्याला काय तोटा!

हां हां ह्मणतां अन्न आलें. त्यास जेवूं घालून कोठें तरी निजविण्याविषयीं आज्ञा झाली. आणि रामदेवराव आपल्या अंतर्गृहांत गेले. ते जाण्यापूर्वीं मायादेवीनें आपल्या त्या नव्या खेळगड्यास ठेवून घेण्याविषयीं त्याजपासून वचन घेतलें. त्या रात्रीं कृष्णदेव फार सुखानें निजला. त्यास किती तरी सुखस्वप्नें पडलीं. आणि काय असेल तें असो, परंतु रामदेवरावाच्या मनांतूनही त्या मुलाची एकंदर हकीकत दूर होईना. त्याचें तें मुग्धसुंदर परंतु दुःखव्याप्त मुख नजरेपुढून हलेना. तें मुख हलेना इतकेंच नव्हे. तर त्याच्याबरोबर आणखीही कोण्या व्यक्तीचें मुख त्याच्यासमोर उभें राहूं लागलें. असें कां! या मुलाचा आणि त्या व्यक्तीचा संबंध काय असणार? मला आज त्या व्यक्तीचें स्मरण इतकें वारंवार कां होतें? आणि होतें तेंही या भिकारी मुलामुळें कां होतें? असे प्रश्न रामदेवरावानें वारंवार आपले आपल्यालाच विचारले. परंतु व्यर्थ. त्यास कांहीं उलगडा होईना.

त्याच रात्रीं बारा वाजून गेले होते. कृष्णदेवाला आज कित्येक दिवसांत झोंप लागली नाहीं, अशी झोंप लागून सुखस्वप्नें पडत होतीं आणि त्याच्या तोंडावर हंसूं झळकत होतें. इकडे रामदेवरावास त्या रात्रीं झोंप कशी ती बिलकुल येईना. त्या नव्या मुलावरून त्याला कोणाची तरी आठवण होऊन तो त्याबद्दलच विचार करीत बसला होता. अशा स्थितींत वर सांगितल्याप्रमाणें बारा वाजून गेले.

रामदेवरावाचा डोळा किंचित् लागतो न लागतो इतका बेत होता, इतक्यांत एकदम राणीवशांत कोणी तरी 'धांवा' 'धांवा' ह्मणून ओरडल्याचा त्याला भास झाला. रामदेवराव अर्धवट झोंपेंत होता, यामुळें त्यास आपण ऐकलें हें खरें कीं, स्वप्नांत याबद्दल शंका वाटली आणि तो तसाच या कुशीचा त्या कुशीवर पडला. तितक्यांत त्याचा डोळा अधिकच लागला. इतकेंच नव्हे, तर त्याला कांहीं चमत्कारिक स्वप्नही पडलें. तें असें कीं, आपली बहीण यशोदादेवी सती जाण्याचा निश्चय करून आपल्यापुढें उभी आहे. प्रचंड चिता वगैरे रचून तिच्या नवऱ्याचें प्रेत त्यावर ठेविलें आहे, आणि सर्व मंडळी सभोंवतालीं जमून एकसारखी आक्रोश करीत आहे. यशोदादेवी मात्र चांगली हंसत आहे. तिच्या मुखावर शोकाची मुळींच छाया दिसत नाहीं. तिनें आपल्याला जवळ बोलाविलें आहे आणि ती आपणास कांहीं तरी निरवीत आहे. तें तिचें निरवणें संपून ती आतां चितेंत प्रवेश करून तेथून कांहीं पुनः आठवल्यामुळें बोलत आहे तों एकदम भडका झाला, आणि सर्व मंडळीचा रडण्याचा गोंधळ सुरू झाला. येथपर्यंत त्याचें स्वप्न येतें, तों तो खाड्कन् जागा झाला, आणि पाहतो तों खरोखरीच मोठा थोरला गोंधळ उडालेला असून राणीवशाच्या एका भागाला आग लागून भडका झाला आहे. राणीवशाच्या ज्या भागाला आग लागलेली दिसली त्याच भागांत मायादेवीची निजण्याची जागा होती आणि

तिच्याजवळच पलीकडच्या खोलींत कृष्णदेवास निजविलेलें होतें. रामदेवराव जागा होऊन तो गोंधळ ऐकतांच आणि भडका पहातांच धांवत तिकडे गेला.

याच्यापूर्वींच कृष्णदेव आपल्या सुखस्वप्नांतून त्याच गोंधळानें जागा झाला होता, आणि गडबड काय आहे त्याचा कानोसा घेतांच त्याला असें कळलें कीं, कोठें तरी आग लागली आहे. तो तडूकन् उठला, आणि दाराच्या बाहेर पडून जिकडून "आग, आग" असा गलगा येत होता, तिकडे धांवत गेला. पहातो तों ज्या खोलींत मायादेवी निजली होती, त्याच खोलीला आग लागली आहे, आणि तिला एकटीला टाकून सगळ्या दासदासी पळून आल्या आहेत. कृष्णदेवाला बरोबर ती कोठें निजली होती हें मुळींच ठाऊक नाहीं. पण तसाच कोणाला न जुमानतां तो त्या पेटलेल्या भागांत शिरण्याची तयारी करूं लागला. कोणीकडून शिरलें असतां आपण मायादेवीजवळ खास जाऊं, याबद्दल काय तो त्या कृतज्ञ पोराचा विचार चालला होता. इतक्यांत मायादेवी एका खिडकीपाशीं येऊन किंचाळी फोडून कोणाला तरी हांका मारतांना त्याच्या दृष्टीस पडली. कृष्णदेवाचें वय तें काय, त्याचा जीव तो केवढा, परंतु मायादेवीची किंचाळी ऐकण्याबरोबर आणि तिला पहाण्याबरोबर त्यानें एकदम त्या जळत्या भागाकडे धांव मारली. त्यावेळीं त्याच्या मनांत तसें करण्याचें कां आलें, मायादेवीनें आपणावर काळ दया

करून या स्थितीला आणलें असें मनांत येऊन त्याच्या मनांत कृतज्ञता उभी राहिली, कीं तो स्वभावतःच धाडसी व परोपकारप्रिय मुलगा होता हें सांगणें मोठें कठिण होतें. एवढी गोष्ट खरी कीं, मायादेवीला पहाण्याबरोबर क्षणभरसुद्धां विचार करण्यांत न गुटमळतां तो त्या जळत्या भागाच्या दारांत शिरला. श्रीमंत आईबापांच्या काळजीनें वाढलेला तो नव्हता. त्याला नानाप्रकारच्या विद्या शिकविण्याला आणि साहसांविषयीं आवड त्याच्या मनांत उत्पन्न करण्याला त्याला शिक्षक ठेवलेले नव्हते. तो अत्यंत दारिद्र्यांत वाढलेला, आणि दरिद्री परंतु सज्जन आईबापांनीं त्याला आपल्या योग्यतेप्रमाणें व ऐपतीप्रमाणें शिक्षण दिलेलें. याशिवाय त्याला शिक्षण देणारा आणखी एक मोठा—फारच मोठा गुरु होता. तो गुरु अनुभव होय. अतिशय एकीकडल्या अशा खेड्यांत तो वाढलेला, परंतु त्यानें आजपर्यंतच्या आपल्या आयुःक्रमांत इतके परिवर्त पाहिले कीं, त्यांपासून त्याला जें शिक्षण मिळालें, तें रामदेवरावासारख्या राजाच्या गृहीं वाढला असतां त्यास मिळालें असतें, कीं नाहीं याची शंकाच आहे. असो. तो साहसप्रिय मुलगा वर सांगितल्याप्रमाणें एकदम कोणालाही न जुमानतां आगींत शिरला, आणि त्यानें त्या मायादेवीच्या किंचाळ्यांच्या अनुसंधानानें धांवत जाऊन मायादेवीची खोली तर गांठली. त्याची शरीरप्रकृति चांगली दृढ होती, आणि शरीरप्रकृतीपेक्षां त्याचें अंतःकरण तर इतकें अधिक दृढ होतें कीं, त्यानें आपल्या

शरीराची मुळींच पर्वा केली नाहीं. त्या खोलींत एका बाजूस एक पातेलें भरून पाणी ठेवलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. आणि एकदम त्याच्या मनांत एक विचार आला. अजून खोलीच्या एका अंगाला तितकी आग चेतली नव्हती. तेथून मायादेवीला ओढून काढून आणणें शक्य होतें. ती मात्र फार घाबरून गेल्याकारणानें तिला त्या बाजूनें पळण्याचें सुचलें नाहीं. कृष्णदेवानें ताड्कन् त्या बाजूनें खोलींत झेंप टाकली आणि भरकन् त्या पातेल्याजवळ जाऊन खोलींतलीं एक दोन चिरगुटें आणून तीं त्या पाण्यांत बुचकळून काढलीं व एक आपल्या डोक्याला गुंडाळून दुसरें मायादेवीच्या अंगाभोंवतीं गुंडाळलें. लागलीच तिला उचललें. त्याच्या जीवाच्या मानानें त्याचें हें करणें मोठें आश्चर्यकारकच खरें. परंतु त्या सपाट्यांत त्यानें तितकें केलें खरें.

कृष्णदेव याप्रमाणें आंत कारभार करीत असतां रामदेवराव तेथें आला. तो येतो आहेसें पहातांच भेदरलेल्या चाकरनोकरांची फार त्रेधा उडाली आणि ज्यांना आधीं कांहीं धीर नव्हता, ते आतां भराभर सैरावैरा धांवूं लागले. कांहीं झालें तरी आतां आपला जीव वांचत नाहीं. आपण इतका वेळ भेदरून स्वस्थ हात जोडून बसलों होतों असें कळल्यास रामदेवराव संतापून आपल्यास देहांत प्रायश्चित्त दिल्याखेरीज सोडीत नाहीं हें त्यांस पक्कें वाटलें, तेव्हां त्यानें आपल्यास ठार मारण्यापेक्षां आपण होऊनच आगींत उडी कां नाहीं घातली! असा विचार करूनच कांहीं लोक आंत

शिरले. रामदेवराव त्या ठिकाणीं येतो, तों किती तरी दासदासींची आणि शिपाईप्याद्यांची धांदल! कृष्णदेव आंत गेला आहे तोंच काय तो पाहिल्या प्रथम आपल्या जीवावर उदार होऊन गेला, हें एकाच्याही तोंडून त्यास कळलें नाहीं. कोण सांगतो! रामदेवरावानें आल्याबरोबर त्या जळत वाड्याच्या सभोंवार एकवार फिरून पाहून कोठें आंत शिरण्यास रस्ता आहे हें पाहिलें आणि एका बाजूनें तो शिरणार तोंच त्याच्या पायापाशीं धाडकन् कांहीं तरी येऊन पडलें. समोर चेतलेल्या ज्वालांच्या तेजानें मंदावलेल्या त्याच्या डोळयास आपल्या पायांजवळ एकदम काय पडलें हें क्षणमात्र समजलेंच नाहीं. परंतु नीट न्याहाळून पहातो, तों मायादेवी, आणि कृष्णदेव दोघेंही अगदीं बेशुद्ध पडलेलीं. मायादेवीस पहातांच त्याचा आनंद गगनांत मावेना. या पोरानेंच त्या पोरीला सुरक्षितपणें बाहेर काढलें असावें हें खचित असें त्याच्या मनाला पक्कें वाटलें, आणि त्या पोराबद्दल त्याला फार प्रेम उत्पन्न झालें. लागलीच त्यानें त्या दोघांस उचलून नेवून शुद्धीवर आणण्यासाठीं उपाययोजना सुरू केल्या. मायादेवीचे प्राण वांचले ही गोष्ट पहातांच त्याला जो हर्ष झाला, त्या हर्षाच्या भरांत चाकरनोकरांच्या भित्रेपणाबद्दल विचारपूस करण्याची त्याला मुळींसुद्धां बुद्धि उत्पन्न झाली नाहीं. मायादेवी जर तशीच वाड्यांत जळून मरती, तर मात्र त्या सर्वांचें काय झालें असतें आणि काय नाहीं याचा नेमच नव्हता. परंतु मायादेवीस शुद्धीवर आणण्यांत व ती

शुद्धीवर आल्यावरही भयानें किंकाळ्या मारीत होती, त्या- साठीं तिला समजाविण्यांत, व तिची भीति दूर करण्यांत त्याचें मन आणि काळ दोनही गुंतून गेलीं. मायादेवीला पूर्वस्थितीवर आणण्यासाठीं उपचार झाले, त्याबरोबर कृष्ण- देवालाही शुद्धीवर आणण्यास झाले हें सांगणें नकोच. तोही लवकरच शुद्धीवर आला आणि रामदेवरावास त्याच्याबद्दल फारच प्रेम उत्पन्न झालें. मायादेवी तर त्या घटकेपासून त्याला आपला भाऊ ह्मणूं लागली. आणि त्याच्यावांचून तिला चैन पडेनासें झालें. कृष्णदेव अगदीं भिकारडा पोर, कोठून आला कांहीं कोणाला माहिती नाहीं, कोणाचा कोण याचा पत्ता नाहीं, असें असतां त्याचा एवढा दिमाख व्हावा हें अर्थातच रामदेवरावाच्या कित्येक परि- चारकांस बिलकुल खपलें नाहीं आणि ते त्याचा अतोनात हेवा करूं लागले. रामदेवरावाचें तर प्रेम त्या मुलावर दिवसानुदिवस फारच बसत चाललें, आणि तें प्रेम बसत जाण्यास त्याच्या साहसादि गुणांपेक्षांही कांहीं तरी फार निराळें कारण असलें पाहिजे असें त्याला वाटत असे. कृष्णदेव कोणाचा कोण याबद्दल त्यानें त्याच्यापाशीं अनेक- वार चौकशी केली, परंतु पैठणाजवळच्या एका खेडेगांवांत अतिशय दरिद्री असा एक शेतकरी राहत होता, त्याचा मी मुलगा, माझी आई आणखी बाप दोघेंही अतिशय ह्मातारीं होतीं, तीं एकदम एका दिवसांत वारलीं, तेव्हां आपल्या पदरीं येऊन राहून कांहीं भाग्योदय झाला तर पहावा या

उद्देशानें निघून आलों, एवढेंच तो सांगे. रामदेवरावानें त्या खेड्यांत माणसें पाठवून शोध करून पहातां त्यास असें कळलें कीं, कृष्णदेव नांवें सांगतो, त्या नांवांचीं दोन फार वृद्ध माणसें तेथें रहात होतीं खरीं, आणि त्यांना एक लहान मुलगा होता हेंही खरें, परंतु तीं दोघें म्हातारीं माणसें कांहीं चमत्कारानें एके दिवशीं एका घटकेस वारलीं, आणि मुलगा कोणीकडे निघून गेला. याच्या पलीकडे कोणा-चाही अधिक पत्ता कधीं लागला नाहीं. आणि रामदेव-रावानें अधिक शोध केलाही नाहीं. परंतु त्याच्या मनांत उद्भवलेल्या प्रेमाबद्दल मात्र त्यास आश्चर्य वाटे.

असें होतां होतां एके दिवशीं कृष्णदेव गाढ झोंपेंत असतां रामदेवराव सहज त्याच्या जवळ गेला. आणि त्याच्या चेहऱ्याकडे पहात उभा राहिला. कृष्णदेव पहिल्या प्रथम आला, तेव्हां त्याला किती दिवसांत पुरतेसें अन्न नव्हतें. आणि एक दोन दिवस तर तो उपाशींच होता म्हटलें तरी चालेल.

परंतु हल्लीं त्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्था उत्तम अस-ल्यामुळें त्याची प्रकृति फार चांगली झाली होती. त्याचा चेहरा जात्याच मोठा ऐटबाज होता, आणि या वेळीं त्यास कांहीं तरी सुंदर स्वप्न पडत असल्यामुळें त्यावर हंसूं झळकत होतें, त्यामुळें विशेषच तेजस्विता दिसत होती. ती पहातां पहातां एकदम रामदेवरावास कांहीं आठवल्याप्रमाणें झालें. त्याच्यापुढें कोणा दोन व्यक्तींच्या चर्या दिसूं लागल्या. तो

तीन तीनदां वर हवेंत पाही, आणि पुनः खालीं त्या सुखनिद्रेंत असलेल्या कृष्णदेवाच्या मुखाकडे पाही. असें पांच चार वेळां झाल्यानंतर त्यानें त्याच्या अंगावरलें पांघरुण काढून पाहिलें नंतर पुनः त्यानें त्याच्या मुखाकडे पाहिलें आणि एकदम "बहुतकरून तोच. पण खात्री कशी व्हावी?" असें तो उद्गारला. त्यानें विचार करीत दोन तीन वेळां इकडून तिकडे तिकडून इकडे फेऱ्या घातल्या, आणि कपाळ चोळीत तो तेथून निघून गेला. त्यानें आपल्याकडून पुष्कळ वेळ विचार केला. जों जों अधिक विचार करावा तों तों त्याला त्याच्या मनांत कित्येक दिवसपर्यंत असलेल्या शंकेबद्दल आज अगदीं खात्री वाटूं लागली. असें कांहीं तरी असल्याखेरीज आपल्याला त्याच्याबद्दल इतकें प्रेम वाटलेंच नसतें. 'सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः' हें कवीचें ह्मणणेंच खरें, असा तो आपल्या मनाशीं विचार करीत राहिला. परंतु केवळ मनःप्रवृत्तीवर अवलंबून कोणी रहावें? त्याच्या मनाला नेहमींपेक्षांही अधिक अशी तळमळ लागली. आणि त्यानें त्याबद्दलचा पक्का शोध करण्यासाठीं माणसें पाठविलीं.

या दरम्यान इकडे एक चमत्कार झाला.

कृष्णदेव आणि मायादेवी एकमेकांशीं खेळत होतीं. खेळतां खेळतां मायादेवी त्यास ह्मणाली, "तूं किनी माझा भाऊ, मी ह्मणतें तें मला अगदीं खरं वाटून ह्मणतें. आपली मंजुळाबाई आहे कीं नाहीं, तिनं मला कितीकदां सांगितलं,

कीं, माझा एक वडील भाऊ होता, एकदां मोंगलाची स्वारी झाली त्यावेळीं माझ्या बाबांवर आणखी आईवर पळण्याचा प्रसंग येऊन त्या गर्दींत तो कोणीकडे नाहींसा झाला. मंजुळाबाईनें मला हें सांगितल्या दिवसापासून मी माझा भाऊ कसा असेल, कुठें असेल, त्याला कोणी नेलें असेल याच्याविषयीं कितीदां तरी विचार करीत बसतें. तूं सांपडल्या दिवसापासून मला आपलं वाटतं कीं, तूंच माझा भाऊ. आणखी भाऊ, तूं मला आगींतून नाहीं बरं वाचवलंस ! मग तूं माझा भाऊ नव्हेस तर काय झालं ?" तिचें तें बोलणें ऐकून कृष्णदेव तिच्याकडे चमत्कारिक तऱ्हेनें पाहूं लागला. त्याला एकाएकीं कांहीं स्मरल्याप्रमाणें झालें. आणि तो सुस्कारे टाकून मायादेवीस ह्मणतो, "मायादेवी, तूं ह्मणतेस इतकं माझं कुठलं थोर नशीब असायला ! पण माझ्या आईबापांनीं मला शेवटीं सांगितलं खरं, कीं आह्मी कांहीं तुझे खरे आईबाप नाहीं. तूं आह्माला एका झाडाखालीं सांपडलास. मायादेवी, माझ्याजवळ त्यांनीं एक खुणेसाठीं ह्मणून जिन्नस दिलेली आहे, ती आजपर्यंत मी अतिशय काळजीपूर्वक बाळगली आहे. पण मी कोणा थोराचा मुलगा असेन असं माझ्या स्वप्नांत सुद्धां कधीं आलं नाहीं. तूं पहा पाहिजे तर ती जिन्नस. असें ह्मणून त्यानें आपल्या कोठडीकडे धांव मारली आणि धांवत जाऊन एक डबी तो घेऊन आला. ही डबी त्यानें उघडली तों आंतून एक हिऱ्यांचें पिंपळपान झळकलें.

हें पिंपळपान तो दाखवीत असतां आणि मायादेवी तें अगदीं चित्त लावून पहात असतां दोघांसही खोलींत आणखी कोणी आलें कीं काय, याचें भान सुद्धां राहिलें नाहीं. रामदेवराव केव्हांच खोलींत येऊन उभा रहून त्यानें तें पिंपळपान पाहिलें. त्याची दृष्टि त्या पिंपळपानावर बसतांच त्याच्या मनाची खात्री झाली. आणि कृष्णदेव व मायादेवी यांच्या चर्येंत असणारें साम्य आज इतक्या दिवसांत कधीं जितक्या स्पष्टपणें त्याच्या मनांत उभें राहिलें नव्हतें, इतक्या स्पष्टपणें त्याच्या मनांत उभें राहिलें. तो वारंवार त्या दोघां मुलांकडे पाही, आणि या पिंपळपानाकडे पाही. त्याचप्रमाणें त्या मुलांचें निसर्गमधुर असें भाषण चाललें होतें तें ऐके. कृष्णदेव त्या मुलीस एकदम मधेंच ह्मणाला, "तूं माझी बहीण असं ह्मणूं नको. कारण मी यःकश्चित् भिकारी लोकांच्या घरीं वाढलेला. पण माझें हें पिंपळपान तूं आपल्या बाहुलीला दागिना ह्मणून घे. हें मी आज किती दिवस तरी मोठ्या काळजीनं ठेवलं. आज सहजासहजी गोष्ट निघाली, तेव्हां तें असं जपून ठेवण्यापेक्षां तुझ्या बाहुलीला दागिना ह्मणून घालण्यालाच चांगलें आहे असं मला वाटलं. घे हें, नाहीं तर बाहुलीच माझ्याजवळ आणून दे. मी तें नीट बाहुलीच्या केंसांना बांधतों. जा बाहुली आण."
मायादेवीला तो त्याचा विचार फार आवडला. आणि ती तावडतोब आपली बाहुली आणण्यासाठीं उठली व वर

पहातें तों तिच्या दृष्टीस रामदेवराव पडला. रामदेवरावास पहातांच मायादेवी त्याच्याकडे धांवली, व 'मामा, मामा, पहा हो ही या कृष्णदेवानें माझ्या बाहुलीला काय काय मौज दिली आहे ती!' असें ह्मणून तें पिंपळपान कृष्णदेवाच्या हातून घेऊन रामदेवरावाच्या हातीं दिलें. रामदेवरावानें तें जपळून पहातांच त्याला अधिकाधिक खात्री वाटूं लागली, कीं हें पिंपळपान आपण आपल्या बहिणीला पहिल्यानेंच ती बाळंत होऊन मुलगा झाला, त्यावेळीं दिलें होतें तेंच हें. आणि हा यशोदादेवीचाच मुलगा अशी खात्री झाली. त्यानें तें पिंपळपान घेऊन राणीवशांतही नेऊन दाखविलें. तेथें रामदेवरावाच्या पत्नीनेंही तें ओळखलें. कृष्णदेव हा आपला भाचाच खास अशाबद्दल रामदेवरावाची व त्याच्या बायकोची खात्री झाली, आणि मग ती खात्री अगदीं कायमची करण्यासाठीं रामदेवरावानें कृष्णदेव ज्या जागीं वाढला तेथें जाऊन प्रत्यक्ष चौकशी केली. त्या चौकशींतही त्यास असेंच आढळून आलें कीं, कृष्णदेव हा त्या दरिद्री शेतकऱ्याचा मुलगा नव्हे, तर त्यांना आपल्या शेतांतील एका झाडाखालीं निजलेला आढळला, तो त्यांनीं बाळगून मोठ्या आस्थेनें वाढविला. अल्लाउद्दीनाच्या लोकांनीं एकदोन वार रामदेवरावाच्या मुलुखावर स्वाऱ्या केल्या, त्या स्वाऱ्यांपैकीं एका स्वारींत कृष्णदेवाचा बाप लढला. परंतु त्याच्या शिपायांनीं त्यास सोडल्यामुळें त्यास शत्रूस पाठ दाखवावी

लागली. इतकेंच नव्हे, तर एके ठिकाणीं मुक्काम केला असतां शत्रु पाठलाग करीत आला आहे असें कळून एकदम मुक्काम उठवावा लागला, आणि त्या धांदलींत कृष्णदेव झाडाच्या खालींच राहिला गेला. त्या दिवसापासून कृष्णदेवाच्या बापानें आपल्या भित्रेपणाबद्दल आपल्या स्वतःस कधींही क्षमा केली नाहीं. आणि शेवटीं त्या आपल्या मुलाचें नांव घेत घेत एका मोहिमेंत देह ठेविला. त्याची बायको त्याच्याबरोबर सती गेली हें या गोष्टीच्या प्रारंभींच वाचकांस सांगितलें आहे. मायादेवीच्या बालमनानें अजाणपणें आपल्या भावास ओळखलें काय? असेल. नाहीं तर अशा भिकारी मुलाकडे एकदम तिचें चित्त कां आकर्षलें जावें? कांहीं वस्तु पाहून किंवा शब्द ऐकून मनुष्य तिकडे आकर्षला जातो, त्याचें कारण पूर्वसंबंध अजाणपणें मनांत उभा रहातो हेंच खरें.

हा कृष्णदेव पुढें रामदेवरावाच्या फार उपयोगीं पडला.

गरीब बिचारी पार्वतीबाई.

पार्वतीबाई कपाळाला पट्टी बांधून डोळ्यांतून अश्रु गाळीत बसली होती. आज दोन दिवस झाले, तिच्या पोटांत मुळींच अन्न नाहीं, आणि मुलें दोन एकसारखीं खायला खायला ह्मणून चिंव चिंव करीत होतीं, त्यांच्याकडे पाहून तिच्या पोटांतून उमाळे येत. पण बिचारी करते काय! कोठें जाऊन कोणाचें दळणकांडण करून मिळवून आणावें, तर तसें तिच्या अंगांत त्राणच राहिलें नाहीं. आतां नवरा घरीं येईल आणि काय ह्मणेल त्याची तिला क्षणोक्षणीं भीति वाटत होती. इतक्यांत दत्तोपंत आलाच. त्याचीं पावलें दाराशीं वाजतांच दोन्हीं मुलें एकदम विजेचा धक्का बसल्याप्रमाणें चमकून उठलीं, आणि अगदीं अंधारांत कोंपऱ्यांत जाऊन बसलीं. दत्तोपंत आल्याबरोबर एकदम आधीं पार्वतीबाईच्या अंगावर आले, आणि ह्मणतात— " काय? कांहीं भातभाकरी झाली आहे का नाहीं? चल काय झालं असेल तें माझ्यापुढें ठेवनू मला दोन घांस खाऊन जाऊं दे. आण, आण लवकर. "

"काय आणूं? भाकरी कशाची करूं? अन् भात तरी कशाचा करूं? घरांत कांहीं ह्मटल्या कांहीं तरी आहेका?"

" कशाची तरी कर. भाकरी नाहीं भात, भात नाहीं दुसरं कांहीं. कांहीं तरी करून मला घाल. मला आज ती

त्या नाट्यकलोत्तेजक मंडळीच्या नव्या खेळाची रात्रीं तालीम आहे, तिकडे तयारी करायला जायचं आहे. त्यांनीं आत्तांच मला सांगितलं कीं, ' दत्तोपंत, आपल्यावांचून सगळी व्यवस्था नीट व्हायची नाहीं. ' चल मला बसायला इतका सुद्धां वेळ नाहीं."

" भाकरी नाहीं तर भात, भात नाहीं तर दुसरं कांहीं तोंडानं भराभर येतं, पण तें खरोखर यायला पाहिजेना ?— आज घरांत कांहीं सुद्धां नाहीं."

" उगीच ' कांहीं नाहीं ' ' कांहीं नाहीं ' असं ह्मणून मला सतावूं नकोस. काय असेल नसेल तें आतां आधीं शिजवून मला घाल. मग तुमचं तुह्मी काय वाटेल तें करा, नाहीं तर मरा. चल, ऊठ आटप."

"अहो, मी तुह्माला खरं खरं सांगतें. आज घरांत कांहीं सुद्धां नाहीं. असतं तर मी एव्हांना तयार करून ठेवलं नसतं कां ? कोंडा ह्मटला, तर कोंडा सुद्धां नाहीं, आणखी तर काय ? कांहीं तरी आणा, ह्मणजे माझ्याच्यानं आज उठवत नाहीं तरी कशीबशी उठेन, आणखी करून घालीन. कांहीं नाहींच तर आतां काय करणार ? "

हें भाषण ऐकून दत्तोपंतदादांचें पित्त भडकलें आणि ते एकदम तिच्या अंगावर धांवून ह्मणतात.

" सकाळपासून रिकामटेंकडी बसून केलंस काय तर मग ? ' कांहीं नाहीं ' ह्मणून सांगायला कांहीं लाज नाहीं

वाटत ? शेजारीं त्या कृष्णाजीपंताकडे नाहीं तर यशोदा-बाईकडे जाऊन कांहीं उसनं कां नाहीं आणलंस ? ”

“ आजपर्यंत त्यांच्यापासून एक पायलीभर जोंधळे उसने आणले त्यांतून एक चिमूटभर तरी परत गेले आहेत का ? आणखी मागायला जायचं तरी कोणच्या तोंडानं ? मला आतां त्यांच्या दारावरून जाण्याची सुद्धां लाज वाटते. पोरं एकसारखीं रडता.....”

“ बस्. बस्. पुरे, समजली तुझी अक्कल. असली खटराक माझ्या गळ्यांत पडली आहे, कीं कांहीं पुसूं नये. परवां नुकते पायलीभर जोंधळे आणले त्याचं वाटोळं केलंस कसं इतक्यांत ? ”

“ अहो, त्याला दिवस किती झाले! तुह्मांलान् तुमच्या पोरांना आज इतके दिवस काय घालीत आलें मग ? मीं आज दोन दिवसांत एक तुकडा तोंडाशीं नेला असला तर शपथ. त्यानं तर माझी स्थिति ही अशी झाली आहे. मला उभं तरी रहावतं आहे का ?”

“ नेहमीं तुझी तक्रार. नेहमीं तक्रार. घरांत पाऊल ठेवण्याचा अवकाश कीं हें नाहीं, तें नाहीं, असलं रडगाणं—गेलीं कुठें तीं दोन्हीं कारटीं ! बसलीं कीं नाहीं बापाच्या नांवानं बोंबलत ! कायरे ए गधड्या ! कां? रडतो आहेस कां ? बाप मेला म्हणून का ? हा बघ चांगला जीवंत आहे. मरेनात शिंचीं सगळीं एकदां ह्मणजे सुटलों असतों. ऊठ, नाहीं तर मारतों एक कमरेंत लाथ, लेंका. गाढ-

वाका शाळेंत जायका नको, शिकायका नको अन् ही अवदसा..........."

पार्वतीबाईच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु वाहूं लागले. मुलांवर तिचा अगदीं जिव कीं प्राण, आणि त्या मुलांना नवऱ्यानें अशा अमंगळवाणीनें उठल्या बसल्या बोलावें यासारखी दुःखद गोष्ट दुसरी कोणचीच नाहीं, असें तिला वाटे पण बिचारी काय करणार? रडण्यापलीकडे तिच्या हातीं कांहींसुद्धां नव्हतें. तथापि तिच्यानें यावेळीं रहावेना. ती एकदम ह्मणते, "अहो, मुलांना कां उगीच अशा प्रकारांनीं बोलतां? त्यांनीं काय केलं आहे? सोन्यासारखीं मुलं दिलीं आहेत चांगलीं देवानं, तीं तुह्मांला पहावत नाहींत?"

बायकोनें असें ह्मटल्यावर मग आणखी काय पाहिजे? स्वारी अगदीं चवताळल्याप्रमाणेंच झाली आणि आतां तिला तिच्या या उद्दामपणाबद्दल शिक्षा करण्यास धांवणार, तों इतक्यांत रंगोपंत दाते त्यांचे शेजारी, आंत आले. दत्तोपंतास किंचित् लाज वाटून ते मागें सरले. रंगोपंतांनीं हंसत हंसतच, विचारलें "कां दत्तोपंत, कसं काय? तुह्मांला एक नोकरी आणली आहे बोआ आमच्याच हापिसांत. पतकरतां का?"

रंगोपंतास दत्तोपंताची एकंदर स्थिति काय आहे ती ठाऊक होती, आणि त्याच्या बायकोची त्यास फार कींव येत असे. आजपर्यंत त्यानें आपल्या बायकोकडून

अनेक मार्गांनीं पार्वतीबाईस मदत केली असेल, परंतु दत्तोपंतास त्याबद्दल कधींच कांहीं वाटलें नाहीं. असो.

रंगोपंत वर सांगितल्याप्रमाणें हंसत हंसत बोलले खरे, परंतु दत्तोपंत अगदीं कुरठून जाऊन तिरस्कारानेंच त्याच्याकडे पहात होता. रंगोपंत त्याला त्याच्या आळसाबद्दल व व्यर्थ वेळ घालविण्याबद्दल वारंवार बोले, हें त्यास आवडत नसे. उलट तो वाटेल त्यावेळीं आपल्या घरीं येऊन बायकोपाशीं बोलत असतो, आपलीं मुलें त्याच्या घरीं जातात, याबद्दलही त्यास मोठा राग येत असे. परंतु तसें बोलून दाखविण्याची कांहीं त्यास छाती नव्हती. कारण रंगोपंताची दानतच तशी विलक्षण होती. आपल्यावर या गृहस्थाचा इतका क्रोध आहे, असें त्या बिचाऱ्या रंगोपंताच्या स्वप्नांतही नव्हतें. दत्तोपंत आपल्या प्रश्नाचें काय उत्तर देतो याची तो वाट पहात होता. इतक्यांत कोंपऱ्यांत अगदीं दडून जाऊन बसलेल्या त्या मुलांकडे त्याची दृष्टि गेली. आणि त्यानें त्यांस हांक मारिली. पण मुलें पुढें येईनात. धाकटी मुलगी तर एकसारखी थरथर कांपत होती. "ये, गणू, ये. मथे, ये. अशीं कां दडून बसलां अगदीं जाऊन? कां रे रडतां?" रंगोपंतानें त्यांस विचारलें, पण तीं कांहीं केल्या बोलेनात, किंवा जवळही येईनात. रंगोपंत बोलावताहेत, तर त्यांच्याजवळ जावें असें अनेक वेळां त्यांच्या मनांत आलें असेल, परंतु बापाकडे हळूच पाहिलें असतां त्याची ती क्रूर चर्या

पाहून त्यांचें पाऊल जागचें उठेना. तीं आपल्या बापाकडे किती भीत भीत, चोरून आणि विलक्षण दृष्टीनें पहाताहेत हें रंगोपंतानें पहातांच त्यास त्यांची फारच कींव आली, व तो एकदम त्या मुलांजवळ जाऊन ह्मणतो, "कां रे रडतां?" एका मुलानें उत्तर दिलें "कांहीं नाहीं. उगीच." मुलीनें ह्मटलें, "भूक लागली. खायला पाहिजे." परंतु हे तिचे शब्द इतके घशांतल्या घशांत आले कीं कांहीं विचारूंच नये. ती अगदीं लहान, तिला मोठ्या मुलाइतकें ज्ञान आलेलें नव्हतें, ह्मणूनच ती केवळ खरें होतें तें बोलली. बाकी आपण बोलतों हें बरें करीत नाहीं अशी भीति तिच्याही मनाला वाटली असलीच पाहिजे. कारण ती तीं अक्षरें उच्चारतां उच्चारतांच अतिशय भेदरलेल्या डोळ्यांनीं आपल्या बापाकडे पहात होती. काय करणार बिचारी? तिनें जे शब्द उच्चारले, ते दत्तोपंताच्या कानीं गेले नाहींत ह्मणूनच बरें झालें, नाहीं तर त्यानें तेथल्या तेथें तिची त्रेधा उडवून दिली असती.

पार्वतीबाई बिचारी रंगोपंत येण्याबरोबर मर्यादेनें उठून उभी राहिली, व झट्कन् अश्रु पुसून दुसरीकडेसच पाहूं लागली. आपली दैना कोणास कधीं दिसूं नये ही तर तिची मोठी इच्छा; परंतु आपला अपमान तर त्याच्याहीपेक्षां कोणास दिसूं नये. रंगोपंत आल्या वेळेपासून तिला असें वाटत होतें कीं, यानें झाला प्रकार खास ऐकिला असावा.

रंगोपंत सुजाण माणूस होता. त्यानें ती तिच्या मनाची

स्थिती पक्केपणें ओळखिली, आणि त्यामुळें तर त्याला तिची अधिकच कींव आली. तो लागलीच दत्तोपंताकडे वळला आणि ह्मणतो, "मग कसं काय? मीं चाकरी आणली आहे ती पतकरणार का? पगार वगैरे चांगला बेताचा आहे. एकदां चिकटून राहिलां ह्मणजे ठीक जुळेल." दत्तोपंत कांहीं केल्या आधीं नीट बोलेचना. रंगोपंतानें पुनः त्यास विचारलें. तेव्हां तो त्रासिक मुद्रा करून त्यास ह्मणतो, "नाहीं. मला त्या तसल्या नौकरीची मुळींच जरूर नाहीं. मला दुसरें काम लवकरच मिळणार आहे."

रंगोपंतास त्या त्याच्या बोलण्याचा किंचित् राग आला. परंतु तो बाहेर न दाखवितां एकदम तो त्यास ह्मणतो, "ठीक आहे. दुसरं ज्यास्त फायद्याचं काम तुह्मांला मिळत असेल तर उत्तमच झालं. आमच्या या नौकरीला काय शेंकडों उमेदवार तयार होतील. मला आपलं वाटलं कीं, तुमच्या सध्यांच्या स्थितींत तुह्मी कांहीं असली चाकरी हातची जाऊं देणार नाहीं."

नवऱ्यानें रंगोपंतांस दिलेलें उत्तर ऐकून पार्वतीबाईस फार फार वाईट वाटलें. प्रथमतः तिला अशी आशा उत्पन्न झाली होती कीं, ही चाकरी तरी नवरा हातची न घालवितां जें काय मिळेल त्या थोड्याबहुतांत आपला गुजारा नीट-नेटका करूं लागेल. परंतु ती सर्व तिची भ्रांति होती. तिच्यानें या वेळीं बोलल्यावांचून राहवेना. ती एकदम

आपल्या नवऱ्याकडे वळून त्यास ह्मणते, "अहो, जा, मी तुह्मांला हात जोडून सांगतें, अशी संधी कांहीं वायां घालवूं नका. त्या मेल्या नाटकवाल्यांचं काय जातं आहे फुकट मेहनत करायला आपल्यासारखं माणूस मिळाल्यावर? एक कवडीची तरी त्यांच्यापासून प्राप्ति व्हायची होती! द्या सोडून आतां हे सगळे नाद, आणखी धरा ही चाकरी!"

हें ऐकतांच दत्तोपंताच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोंचली. आणि एकदम "चल. नीघ. नीघ. तुझी ही रिकामटेंकडी टकळी माझ्या मुळींच उपयोगी नाहीं. दुसऱ्यांच्या घरांत बायकोचें असेल प्राबल्य. माझ्या घरांत कांहीं तें उपयोगी नाहीं. मला असल्या खरडघाशीच्या नौकरीची मुळींच जरूर नाहीं. मी त्या नाटक मंडळी-च्याच बरोबर रहाणार. त्यांचींच कामं करणार. कोण मला बोलणार आहे न् काय बोलतो तें पाहूं दे. पुनः जो या घरांत पाऊल घालील तो....जा. मर. तूं आणखी तुझीं तीं कारटीं. वाटेल तें करा. बायकोनं या तऱ्हेनं बोललेलं मला मुळींच खपायचं नाहीं. हा मी चाललों."

इतकें ह्मणून स्वारी तडाक्यासरशी उठून दाराकडे धांवलीच. पार्वतीबाईस असें झालें कीं, आपण कोठून काय बोलायला गेलों आणखी हें काय झालें!

रंगोपंतास या वेळीं दत्तोपंताचा विशेषच राग आला असावा असें त्याच्या चर्येवरून दिसलें. परंतु तसें कांहींएक न दाखवितां तो शांतपणें त्यास ह्मणतो, "दत्तोपंत, पैसे

बिसे मिळण्याची कांहींसुद्धां आशा नसतां उगीचच जर त्या नाटकवाल्या मंडळींत जाऊन विनाकारण वेळ घाल-विणार असलां, तर तें कांहीं बरं नाहीं. तुमच्या घरांत काय स्थिति आहे याचा विचार करा. ती नाटकवाली मंडळी काय तुह्मांला देणार आहे असं ? तुह्मी त्यांच्यासाठीं असली चांगली आलेली चाकरी घालवूं नका ? पहा तुह्मी आपल्या कर्तव्यांत अगदीं चुकतां आहां. घरच्या मुलाबा-ळांचं पोट भरा, मग नाटक कंपन्या पहा, कीं आणखी कांहीं पहा. पण घरांत बायकामुलं अन्नावांचून मरताहेत आणखी........"

हे शब्द ऐकण्याबरोबर दत्तोपंत सापासारखा खवळून फुसकारे टाकीत रंगोपंताच्या अंगावर धांवला आणि आर-डतो, "कोण ? तुह्मी कोण माझ्याशीं असलं बोलायला ? तुह्माला कोणीं अधिकार दिला अं ? माझं कर्तव्य काय आणखी मी तें करतों कीं नाहीं हें पहाण्याचा अधिकार तुला दिला कोणीं ? अरे, आपल्या बायकापोरांचीं पोटं जाळतो आहेस तेवढीं पुरे नाहींत का झालीं ? दुसऱ्यांची पंचाईत तुला कशाला अं ? काय रिकामटेकडे लोक असतात पहा ! मला तुझे सगळे कावे ठाऊक नाहींत, समजत नाहींत, असं तुला वाटतं होय ? पुनः या कामांत जर बोलायला आलास, आणखी माझ्या घरांत पाऊल घातलेंस तर तुझी बत्तिशीच पाडून टाकीन."

रंगोपंत कांहीं सामान्य पुरुष नव्हता. दत्तोपंतासारख्या चार किचकट लोकांना त्यानें उडवून दिलें असतें, परंतु

आपण या वेळीं या माणसाशीं मारामारी हाणाहाणी केली, तर न जाणों गोष्टी भलत्याच पंथाला जायच्या, असें त्याच्या मनांत येऊन त्यानें शांति धरली आणि तो स्वस्थ बसला. दत्तोपंताच्या जिभेंतच काय तें त्यांचें वीर्य होतें. तें सर्व खरचल्यानंतर तो ताबडतोब त्या मंडळीस तेथें सोडून चालता झाला. रंगोपंतास तर आतां असें वाटलें कीं, अशा स्थितींत या माणसांना सोडून जाणें विशेषच वाईट. त्यानें तागलीच त्या दोन मुलांस जवळ बोलाविलें. तीं मुलें येतांच पार्वतीबाईला तो ह्मणतो, "या मुलांना मी घेऊन जातों. आणखी मी आपल्या मुलांबरोबर तुह्मांला थोडेंबहुत धान्य कावून देतों. तांदूळ येतांच तुह्मीं आधीं भात करून खा." पार्वतीबाई कांहींच बोलली नाहीं. रंगोपंताबरोबर मुलांस मात्र तिनें जाऊं दिलें.

रंगोपंतानें आपल्या बिऱ्हाडीं जातांच आपल्या बायकोस दत्तोपंताच्या घरचीं झालेली सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून त्या माउलीचीही दयाबुद्धि फारच जागृत झाली. तिनें त्या दोघां मुलांस आंघोळी वगैरे घालून जेवावयास घातलें. आणि आपण चांगला यथास्थित शिधा तयार करून गड्याच्या डोक्यावर देऊन ती पार्वतीबाईकडे स्वतः पोंहो-चविण्यास निघाली. तिला असें वाटलें कीं, पार्वतीबाई किती केलें तरी अस्सलाची आहे. मानी आहे. ती असें धर्मादायाचें घेण्यास व खाण्यास कबूल होणार नाहीं. तर आपण जाऊन तिला आग्रहानें उठवून अंग धुववून

जेवावयास घालावें. या हेतूनें ती माउली पार्वतीबाईच्या खोलींत गेली. तों पार्वतीबाई एकसारखी रडून रडून भुई भिजवीत आहे. तिला उठण्याविषयीं आग्रह केला असतां ती उठेना. मोठ्या कष्टानें तिच्याकडून एकदां उत्तर आलें, "अहो, ते जेवल्यावांचून गेले आहेत, आणखी मी कशी जेवूं ? मी नाहीं जेवायची."

रंगोपंतांच्या पत्नीस पार्वतीबाईस उठवून भात करायला लावण्यास किती तरी श्रम पडले ! तेव्हां ती मोठ्या कष्टानें उठली. आणि अंग धुवून मी भात करतें, तुह्मी जा, ह्मणून तिनें त्यांस आश्वासन दिलें. इतकें झालें, तेव्हां रंगोपंताची पत्नी तेथून निघाली. पार्वतीबाईसही दोन दिवस पोटांत कांहीं नसल्यामुळें भूक लागलेली होती; परंतु आपला नवरा संतापून कांहीं एक न खातां, निघून गेला असतां आपण मात्र यथास्थित जेवणें हें तिच्या मनास मुळीं सुद्धां येईना. तिला असें वाटूं लागलें कीं, आपण भात करतों तों त्यानें यावें आणि आपण आपल्यासाठीं वाढलें पान त्याचेपुढें ठेवून झाल्या गोष्टीबद्दल त्याची क्षमा मागून त्यास पुनः प्रसन्न करावें. या आशेनें ती उठली. आणि तिनें चुलीवर भात ठेविला.

दत्तोपंत ह्मणजे एक निर्लज्जपणाचा पुतळाच होता. तो वर सांगितल्याप्रमाणें निघून गेल्यानंतर तास दीड तास झाला नाहीं तोंच परत आला. पार्वतीबाईनें कांहीं वेळ त्याची वाट पाहून नुकतेंच ताट वाढून घेतलें होतें. आतां

शेवटीं आपला नवरा जेवण्यास येत नाहीं असें तिला वाटलें, तिनें त्याच्या येण्याची आशा अजिबात सोडून दिली. ती भोजनास बसणार, इतक्यांत त्याची पावलें वाजलेलीं ऐकून तिला खरोखर अतोनात आनंद झाला. ती अस्सल हिंदु होती. अर्थातच तिचें आपल्या पतीवर अगदीं निस्सीम असें प्रेम होतें. त्यास पाहण्याबरोबर ती पुढें गेली, आणि, 'तुह्मी आलांत. मला खरोखर समाधान झालें. हा आत्तांच भात वाढून घेतला आहे. जेवणास बसा.' असें विनाविलें. दत्तोपंतास स्वतः पत्नीकडे कांहीं एक दिसत नव्हतें. "तुला आज दोन दिवसांत अन्न नाहीं. तूंच आधीं बस" असें ह्मणण्याची दयाबुद्धि त्यास झाली नाहीं. तो त्या पानावर बसला, आणि चार घास खातो, तोंच रंगोपंत पुन्हां तेथें आला.

रंगोपंताला आपण थोड्या वेळापूर्वी किती अपमानकारक शब्द बोललों, आणि त्यांचा किती तरी उपमर्द केला, पण शेवटीं त्यांच्याच घरून आलेल्या तांदुळाचा भात मुकाट्यानें खातों आहों, याची दत्तोपंताला अणुरेणु इतकीसुद्धां लाज वाटली नाहीं, इतकेंच नव्हे तर तो खुशाल गोळ्यावर गोळे मारीत होता. करील काय बिचारा? ज्या नाट्यकलोत्तेजक मंडळींना तालमीच्यावेळीं व्यवस्था लावण्यास दत्तोपंताची अगदीं विलक्षण आवश्यकता होती, त्यांना त्याच्या जेवण्याला रहाण्याची मुळींच आवश्यकता वाटली नाहीं. तो आपल्या मनांत खूप समजत होता

कीं, आपग तेथेंच असल्यावर मंडळी जेवणाच्या वेळीं आपणांस आग्रह करून ठेवून घेणारच. परंतु तसा प्रकार मुळींच झाला नाहीं. जेवणाची घंटा होतांच मंडळी जेवण्यास धांवली, परंतु दत्तोपंतास कोणी बोलावीना. तशा तऱ्हेनें दत्तोपंत थोडासा मानी असल्याकारणानें आपण होऊनच मीही आज येथेंच जेवायला रहातों असें ह्मणून अगांतुकी करण्याचें त्याच्या मनांत येईना. शेवटीं आपण जाऊन जेवून येतों, असें ह्मटलें असतां तरी हे कोणी कशाला जातां असें ह्मणतील, असा विचार करून त्यानें, "चला बोआ, आतां आह्मी जातोंन् जेवून येतों. आतां काय काम थोडं राहिलं आहे, तेंव्हांच करून टाकूं!" असें म्यानेजर व दुसरी दोन चार मंडळी होती त्यांच्या देखत ह्मटलें. तेंव्हां म्यानेजर चट्कन् ह्मणतात, "हो, हो जा झटकन् या. आणखी येतांना त्या पोलिस जमादारानं दोन तरवारीन् दोन पोषाख देण्याचं कबूल केलं आहे तेवढं घेऊन या. विसरूं नका अं? नाहीं तर तुह्मी काय फंदी, दुसरीकडे कोठें गुंतलां ह्मणजे गुंतलां. आमची इकडे होईल खोटी. जा लवकर जाऊन दोन घास खाऊन आधीं तें सामान घेऊन या." बिचाऱ्या दत्तोपंताची शेवटली आशा तुटली. आपण जातों, असें ह्मटल्यावर तरी आपल्याला हे जेवायला राहून घेतील असें वाटलें होतें; पण तेंही कांहीं जमलें नाहीं. तेंव्हां शेवटीं बिचारा अगदीं निराश होऊन तेथून चालता झाला. पण जातो कुठें? "जेवायला आलों, मला जेवा-

यला घाला " असें ह्मणायचें तरी कसें आणि कोणाला? त्याच्या मनाला वाटलें कीं, रंगोपंताच्या घरून कांहीं तरी शिधा खास आला असेल, आणि बायको कांहीं तरी करीत असेल, तेव्हां घरींच जावें, नाहीं तर मग पुढचें पुढें पहातां येईल. असा विचार करून स्वारी आली तों अदमासाप्रमाणें सर्व कांहीं जुळलेलेंच होतें. आयताच भात झालेला होता, पान वाढलें होतें, मग कां कमी करा? ज्याला हमाली काम कर करून त्याचा मोबदला नुसतें जेवण नाटकमंडळी जवळ मागवलें नाहीं, त्यानें आपली दैना पाहून व आपल्या बायकोची कींव करून दुसऱ्यानें धर्म ह्मणून पाठविलेले तांदूळ, यथास्थित झोडायला कांहीं सुद्धां कमी केलें नाहीं. इतकेंच नव्हे; तर बायकोनें दोन दिवसांत अन्न नसतां आपल्यासाठीं वाढून तयार केलेलें ताट आपल्या पुढें ठेवलें असतां कसें जेवूं असें सुद्धां मनांत आलें नाहीं. तेव्हां काय ह्मणावें! तो मार गोळ्यावर गोळे चढवीत होता. इतक्यांत रंगोपंत तेथें आला, आणि त्याला पाहतांच मात्र दत्तोपंतास अगदीं पाण्यांत टाकलेल्या ढेंकळाप्रमाणें झालें. त्यांत आणखी रंगोपंतानें "पार्वतीबाई, तुह्मीं नाहींच कां बसलां? आणखी भातय् नाहीं का तुह्माला उरला?" असें विचारलें. मग काय विचारतां? दत्तोपंताच्या त्या लाजेस संतापाचें स्वरूप आलें, आणि तो एकदम ह्मणतो, "कांहो? तुह्मांला आमच्या घरांतल्या इतक्या चौकशा? तुह्मीं कोण?

कशाला इथें येतां इतके? कांहीं तुमचं माझं...." पुढें त्याच्यानें बोलवेना. चार घांस भात उरला असेल नसेल तोंच तसाच उठला, ताटाला लाथ मारून तें त्यानें पलीकडे सारलें आणि "तुझ्या घरचे तांदूळ आणले वाटतं या चांडाळणीनं? अरे अरे, याच्यापेक्षां नरक खाल्ला असता, तरी सुद्धां इतकं मला वाईट वाटलं नसतं...."

पुढें तो आणखी काय बोलला हें आतां मी लिहून वाचकांचीं मनें दुखवीत नाहीं. किंबहुना तें लिहून दाखविणें मला शक्यच नाहीं, इतकें तें वाईट होतें. आपण खातों आहोंत हे तांदूळ कोणाच्या इथले आहेत, हें त्याला ठाऊक नव्हतें असें नाहीं. ते तांदुळ तसे आले असतील हें संधान मनांत येऊनच तो मुळीं घरीं धांवत आला; परंतु मघाशीं इतकें उपमर्दाचें भाषण बोलून पुन: आपण त्याच्याच घरून आलेले तांदुळ खातों आहोंत हें त्यानें स्वत: पाहिलें या गोष्टीबद्दल त्याला संताप आला. तो पुन: सकाळच्याप्रमाणेंच संतापून चालता झाला. ऐन करकरीत तिन्हीसांजांची वेळ, अशा वेळीं आपल्या या भरल्यासरल्या घरांतून नवरा अन्नाला प्रत्यक्ष लाथ मारून बाहेर निघून गेला, हें पाहून बिचाऱ्या पार्वतीबाईस इतकें वाईट वाटलें, कीं कांहीं लिहून दाखवितां येत नाहीं. बायकांचें देवभोळें मन तें. आतां या भयंकर अपशकुनापासून अनर्थापात संकटें व अरिष्टें आपणावर येणार असें तिला वाटलें, आणि दोन घास भात भांड्यांत राहिला

होता, तो खावा अशी सुद्धां तिला बुद्धि होईना. करते काय बिचारी ? दत्तोपंत निघून चालता झाल्यानंतर रंगोपंत फार थोडा वेळ तेथें राहिला, आपला नवरा असलीं उपमर्दाचीं बोलणीं बोलला, "त्याबद्दल राग मनांत आणूं नये. काय बोलावं त्याचा सुमार राहात नाहीं. स्वभाव फार संतापी पडला." असें तसें बोलून ती अतोनात गहिंवरून फार रडूं लागली. तें त्याच्यानें पहावेना. आणि ती एकटी घरांत असतां आपण परक्या पुरुषानें फार वेळ तेथें रहावें हें बरें नव्हे, असेंही मनांत येऊन त्यानें तेथून पाय काढला.

त्या रात्रीं पार्वतीबाई पुनः जेवली नाहीं हें उघडच आहे. तिचा मुलगा मात्र तिला सोबत ह्मणून आला. मुलगी रंगोपंताच्या घरींच निजली. इकडे दत्तोपंताची स्वारी संतापांत बाहेर पडली, ती फुत्कारे टाकीत असतांच त्यांना कोणीं हाक मारली आणि "काय दत्तोपंतदादा, आज आह्मी किती वेळ तुमचा शोध करितों आहों, तुह्मी कोठें भेटलांच नाहीं. आपल्याला आज नेलं पाहिजे तालमीला. आपल्याखेरीज आमचा शिरकाव होणार कसा?" असें ह्मटलें. मग काय विचारतां ? दत्तोपंतदादांचा संताप उतरून ते ताबडतोब खुलले व "छे. छे. बोआ, मीं फार जणांना कबूल केलं आहे. तुह्मी आधीं भेटलां असतां तर पाह्यलं असतं. आतां कांहीं सोय नाहीं. आतां पुढल्या तालमीच्या वेळीं नाहीं तर खेळाच्या वेळीं पाहीन." असें आढ्यतेनें ह्मणून गर्दीं गर्दीनें पुढेंच

चालले. तरी तो इसम त्यांच्या पाठोपाठ धांवतोच आहे, त्यांच्या विनवण्या करतोच आहे असा प्रकार चालला होता, त्यामुळें तर स्वारी फारच खुलून गेली व शेवटीं "बरं बरं, माझ्याबरोबर चला त्या जमादारांच्याकडून दोन पोषाख न् दोन तलवारी, बंदुका वगैरे सामान न्यायचं आहे तें घेऊन जायला, ह्मणजे आयतेच आंत चलाल." त्या गृहस्थास दत्तोपंताचे केवढे तरी उपकार वाटले. आणि तसें त्यानें बोलून दाखविलें. मग काय विचारतां? दत्तोपंतास नुसती अगदीं धन्यता झाली. त्या रात्रीं दत्तोपंताच्या विनवण्या किती तरी लोकांनीं केल्या असतील कीं आह्मांला तुह्मी आंत घ्या. आणि तितक्या जणांना सबबी सांगून घालवून देण्यास किंवा उपकार केल्याप्रमाणें आंत घेण्यास दत्तोपंतांस किती तरी प्रयास पडले. "काय लोक असतात बोआ! आतां 'नाहीं' तरी किती लोकांना ह्मणूं, आणखी घेऊं तरी कोणा कोणाला? छे. छे. इथून पळून जाण्याची पाळी आली." असे उद्गार त्यांनीं कितीदां तरी काढले असतील, आणि ते उद्गार काढतांना त्यांनीं कितीदां तरी आपल्या इतर स्नेह्यांकडे पाहून आढ्यतेनें डोळे मिचकाविले असतील. पण घरीं आपली बायको कोण्या स्थितींत असेल, ती जिवंत आहे कीं मेली, याचें त्याला स्मरणसुद्धां झालें नाहीं.

पार्वतीबाई बिचारी तळमळत पडली होती. तितक्यांत तिच्या मुलाला एकाएकीं कांहीं होऊन तो झोंपेंत

मोठ्यानें किंचाळून उठला. पार्वतीबाई अर्थातच घाबरली, आणि गणू, अरे गणू, गणू, काय झालं रे? असें त्याला विचारूं लागली. परंतु तो उत्तर देईना. एकसारख्या किंचाळ्या फोडीत होता. तिनें विचारतां विचारतां शेवटीं मोठ्या कष्टानें त्याच्याकडून तिनें काढलें, कीं त्याच्या पोटांत दुखत होतें. तो अगदीं गडबडां लोळूं लागला. त्याला ते पोटांतले वेठ सहन होईनात. तिनें त्याला सुंठ दिली, मोहरी पोटावर घातली, परंतु व्यर्थ. त्याचें लोळणें, त्याचें किंचाळणें मुळींच बंद होईना. तास झाला, दोन तास झाले, पण त्याच्या दुखण्याचा, लोळण्याचा, व आरडण्याचा जोर अधिकच वाढत चालला, तेव्हां शेवटीं कोणाला तरी हांक मारून आणून कोणी डाक्तर वैद्य वगैरे पहाण्याला काय करावें तें तिला सुचेना. अशा वेळीं सुद्धां नवरा घरीं नाहीं, याबद्दल तिला अतोनात वाईट वाटलें. नवरा जेथें असेल तेथें जाऊन त्याला एकदां बोलावून आणावें असें मनांत आलें. हक्कानें दुसऱ्या कोणाला बोलावून आणणार? काय होईल तें होईल, एकदां जावेंच असें मनांत पक्कें करून ती उठली. शेजारींच यशोदाबाई ह्मणून एक वृद्ध विधवाबाई रहात होती तिच्याकडे ती प्रथम गेली, आणि कृपा करून माझ्या मुला जवळ बसा मी जाऊन तिकडे बोलावून आणतें. असें विनवून व यशोदाबाईस जवळ बसवून ती तेथून गेली. नेहमीं नाहीं तर नाहीं, पण आज तरी त्यांना अशी स्थिति सांगि-

तली ह्मणजे ते घरीं येतील, आणि कोणी वैद्य डाक्तर बोलावून आणतील असें तिला वाटलें. नवऱ्याची नाटकमंडळी कोठें उतरली आहे हें तिला अदमासानें ठाऊक होतें. रंगोपंताला त्रास देणें हें तिला बरें वाटलें नाहीं. आणि ह्मणून ती स्वतःच त्या नाटकमंडळीच्या दाराशीं अदमासानें गेली. तों नाटकाची तालीम संपून आमंत्रित मंडळी जाऊन खाशी मंडळी मद्यपानाचा धिंगाणा घालीत होती. पार्वतीबाई दाराशीं गेली, इतक्यांत कोणी इसम बाहेर आला. त्याला बोलावण्यास सांगावें, पण कोणास ह्मणून सांगावें? नांव कसें घ्यावें? आंत कसें जावें. तिला कांहीं सुचेना. "अहो, गणू अगदीं अत्यवस्थ आहे, गडबडा लोळतो आहे. तुमची बायको तुह्माला बोलावायला आली आहे" असं जाऊन आंत सांगाल का?" असें तिनें विचारलें. गृहस्थ पशु होता. त्यानें "बाई, आंत पन्नास मंडळी बसली आहे तितक्या सगळ्यांना हा निरोप सांगूं का?" असें ह्मणून "होः होः होः" करून हंसत हंसत आंत जाऊन सगळ्या मंडळींत त्यानें तो निरोप मोठ्यानें सांगितला. त्यांत थोडीं माणसें होतीं, तीं हंसलीं नाहींत, पशु होते ते हंसले. दत्तोपंत समजला, आणि आपलीच बायको कांहीं तरी निमित्त काढून आली असावी असें वाटून तो उठला. त्याची एकानें तितक्यांत "तुमची मंडळी वाटतं?" असें ह्मणून इतरांकडे डोळे मिचकावीत टवाळी केली. त्यामुळें तर त्याला बायकोचा फार

संताप आला. त्या गृहस्थाचा राग यावा तो एकीकडेच राहिला. राग आला तो बायकोचा. आणि बाहेर जाऊन तिचें ह्मणणें काय तें मुळींच न ऐकतां तो तिला अद्वातद्वा बोलला. थोडासा आधीं तर्र झाला होता. यामुळें तर त्याच्या जिभेस सुमारच राहिला नाहीं. तूं माझी फजिती करायलाच आली आहेस. चालती हो. तुझा माझा संबंध नाहीं. मरूं दे कारटा मेला तर. तूंही मर त्याच्या मागोमाग आणखी ती कारटी मरूं दे ह्मणजे मी सुटलों. पुनः त्रास नको. चालती हो. दाराशीं उभी सुद्धां राहूं नकोस. पुनः मला तुझें तोंड सुद्धां बघावयास नको. मी आतां तिकडे कधीं सुद्धां येणार नाहीं. असें ह्मणून झटक्यासरसा तेथून तो निघून आंत चालता झाला.

पार्वतीबाईला बिचारीला काय वाटलें असेल? तिची केवढी निराशा झाली? तिला आतां सर्व त्रिभुवन आठवलें आणि ती मुंगीच्या पावलानें तेथून परत चालती झाली. काय करणार! ज्यांच्याकडे जाणें तिच्या अतोनात जिवावरच आलें होतें, त्यांच्याचकडे जाणें शेवटीं भाग पडलें. दुसरा मार्गच राहिला नाहीं. रंगोपंताचे उपकार आतांपर्यंत किती तरी झाले. तेव्हां त्यांचे आणखी किती उपकार करून घ्यायचे असें तिच्या मनास वाटलें. परंतु दुसरें गत्यंतर नव्हतें. रंगोपंतास तिच्या मुलाची स्थिति कळली, तेव्हां तो लागलाच धांवत येऊन काय करायचें तें त्यानें ताबडतोब केलें. डाक्तर आणला. त्याचीं औषधें झालीं,

परंतु त्या मुलाच्या पोटदुखीला कांहीं उतार ह्मणून पडेना. डाक्तरानें तर स्पष्ट सांगितलें कीं, "या मुलाची दोन चार दिवस उपासमार होऊन यानें एकदम फार खाल्या कारणानें हा विलक्षण विकार याला झालेला आहे, आणि त्यांत याला वेळीं औषध मिळालें नाहीं. हा यांतून जगेलच असें खात्रीनें सांगतां येणार नाहीं." वैद्याचें ह्मणणें त्याच प्रकारचें पडलें. तेव्हां कोणी तिला पंचाक्षरी वगैरे पहावा अशाबद्दल सुचविलें. ती तर अगदीं वेडीच झालेली, तिला काय, ती पंचाक्षरी पहाण्याला धांवाधांव करूं लागली; परंतु पंचाक्षरी पैशाखेरीज हलेना. रुपये दोन मागूं लागला; पण रुपये आणणार कोठले? रुपये कोठून मिळतील? कोणाजवळ मागावे? कांहीं तिला सुचेना. शेवटीं इकडे तिकडे विचार करतां करतां तिला असें सुचलें कीं, आपल्या गळ्यांत एक जाळीचा मणि आहे. हा मणी नवऱ्याच्या तडाक्यांतून कसा वांचला-तिनें आजपर्यंत कसा वांचविला तें तिचें तिलाच ठाउक; पण आज पोरासाठीं त्या मण्यावर रुपये आणण्याचा तिनें विचार केला, आणि तिच्या बिऱ्हाडापासून कोणी मावशीबाई बायाबापड्यांशीं देव घेव करीत असे, तिच्या येथें जाऊन तिनें तो मणि देऊन दोन रुपये आणले. ते घेऊन ती घरीं चालली होती, तों वाटेंत तिच्या दारापासून दहा पावलांवर दत्तोपंत भेटले, त्यांनीं "काय आहे? कुठें गेली होतीस? मी घरांत यायला न् तुला बाहेर जायला एकदमच फावतं नाहीं का? कुठें गेली

तीं कामें सांगून तीं त्याजकडून करूनही घेऊं लागली. शनिवारीं कांहीं नवीन सीनरी उभी करावयाची होती, आणि नवीन पडदे चढवावयाचे होते, तेव्हां तें काम दत्तोपंतांना त्यांनीं सांगितलें आणि दत्तोपंतांनीं मोठ्या आनंदानें तें पतकरिलें, व हुरूपानें पार पाडण्यास सुरुवात केली. परंतु दुर्दैव आपलें कोणतेंही कृत्य कांहीं पूर्वी सांगूनसवरून करीत नाहीं. त्याच्या मनांत दत्तोपंतांच्या हुरूपाचा भंग करावयाचा होता. तो त्यानें केला. पडदा चढविण्यासाठीं अवघड जागीं चढलेल्या दत्तोपंताचा पाय घसरून तो एकदम खालीं रंगभूमीवर पडला, तो बेशुद्धच पडला. तशा स्थितींत दत्तोपंताचा मंडळीस उपयोग काय? आतां अर्थातच त्यांना त्याची मोठी पीडा वाटून त्याला शुद्धीवर आणण्याच्या भानगडींत सुद्धां न पडतां त्यांनीं त्याला त्याच्या बिऱ्हाडीं नेऊन पोंहोंचविलें. आणि कोणी तरी डाक्तर पाठवून देतों ह्मणून मंडळी निघून गेली, ती पुनः कशाला कोण तोंड दाखविणार आहे? आपल्या नवऱ्याची तशी ती भयंकर स्थिति पाहून पार्वतीबाईच्या तोंडचें पाणी पळालें. आपल्या मुलाचें दुखणें सुद्धां ती विसरली आणि एकदम दत्तोपंताच्या शुश्रूषेस लागली. रंगोपंत तिला या प्रसंगीं फारच उपयोगीं पडला. गणूस वांचाविणें कांहीं त्याच्या हातचें नव्हतें. तो एक दोन दिवसांतच वारला. ह्याचा रोग आंतड्यांसंबंधी असून असाध्यच होता. परंतु दत्तोपंतास नीट स्थितीवर आणण्यासाठीं त्यानें उपा-

यांची आणि तिनें शुश्रूषेची पराकाष्टा केली. मात्र दत्तो-पंतास त्यांतलें कांहीं सुद्धां समजलें नाहीं. तो चांगला आठ दिवस तसा बेशुद्ध होता. पुढें शुद्धीवर आल्यावर त्यास गणू वारल्याचें समजलें. त्यामुळें त्यास आपल्या पशुंसारख्या आचरणाचा फार पश्चात्ताप झाला. आणि बायकोनें ज्या पुढें दोन महिने त्याच्या खस्ता खाल्या त्यांनीं तर तो अगदीं जिंकलाच गेला. तो दोन महिन्यांनीं चांगला बरा झाला. पण त्याच्या एका पायांत चांगलाच अधुपणा राहिला आहे. रंगोपंताची किंमत त्यानें त्या दुखण्यांत ओळखली. आणि आज त्याच्याच अनुग्रहामुळें तो आपल्या सद्गुणी बायकामुलांसह आपला गरिबीचा संसार श्रीमंतापेक्षांही सुखासमाधानानें हांकीत आहे. गणूची आठवण मात्र त्यास केव्हां केव्हां फार दुःख देते.

रजपुताचा अभिमान.

रजपूत राजांच्या कुळांत स्त्रीपातिव्रत्याचा अभिमान किती होता, आणि आपल्या स्त्रियांचें पातिव्रत्य राखण्याकरितां रजपूत राजे, व रजपूत सरदार किती तत्पर असत, याविषयीं अनेक गोष्टी वाचण्यांत आल्या आहेत. परंतु आपल्या मुलींचें, सुनांचें पातिव्रत्यच नव्हे तर त्यांचें शीलही उत्तम प्रकारें राखण्याविषयीं रजपुतांपैकीं साधारण लोक—खालच्या दर्जाचे लोकही अतोनात कडक असत. जातिभ्रष्टता हा शब्द उच्चारला असतां त्यांचें पित्त भडकून जाऊन तळपायाची आग मस्तकास जाई. अकबर बादशहानें कांहीं रजपूत राजांना वश करून घेऊन त्यांच्या मुली आपल्या राण्या करून घेतल्या, किंवा पुढें दोन तीन पिढ्यांपर्यंत प्रत्येक राजपुत्राला एक एक दोन दोन हिंदु पत्न्या होत्या. एवढ्यानें रजपूत व मुसलमान यांचा मिलाफ झाला होता, व परस्परांत रोटीबेटीव्यवहार चांगला सुरू झाला होता असें समजूं नये. गरीबगुरीब प्रजाजनांना तें बिलकुल आवडत नसे, आणि आपली जात बाटविल्याबद्दल त्यांस राजांचा रागही येत असे. ज्यांनीं मुसलमानांच्या घरीं आपल्या मुली दिल्या, त्यांच्या घराण्यांचा तिट्कारा करणारे दुसरे सरदार दरकदार, राजे रजवाडे कांहीं

थोडे होते असें नाहीं. रजपुतांस या जात बाटविण्याचा किती तिट्कारा असे हें पुढील गोष्टीवरून चांगलें समजेल.

आग्र्यास पूर्वी अकबराची राजधानी होती आणि त्यास अकबराबाद असें फार दिवस ह्मणतही. अकबराचे वेळीं हें शहर ह्मणजे अतोनात भराभराटीला आलेलें. या शहरांत बखतसिंग नांवाचा रजपूत सौदागिरी करून रहात असे. दगडी सामानाबद्दल हें शहर तेंव्हांपासून फार प्रसिद्ध. बखतसिंगाचें कुटुंब इन मिन तीन माणसांचें. आपण स्वतः, आपली बायको व एक मुलगी. त्यास बरेच दिवसांत अपत्य नव्हतें. यामुळें त्याचीं व त्याच्या बायकोचीं कित्येक वर्षें अतोनात दुःखांत गेली. मुलगा नाहीं तर नाहीं, आपल्याला एखादी मुलगी झाली, तरी आपण आनंदांत राहूं, असें त्या जोडप्यास वाटे. शेवटीं परमेश्वरानें त्याचें गाऱ्हाणें ऐकलें, आणखी त्यास एक मुलगी झाली. फारा दिवसांनीं अपत्य झालें, यामुळें मुलगा नाहीं याबद्दल दुःख न होतां त्या दोघांना मूल झालें एवढ्याबद्दलच फार आनंद झाला. आणि त्यांच्या गरिबीप्रमाणें त्यांनीं उत्सव करायचा तसा केला. त्या मुलीचें नांव आशावती ठेविलें. जणूं काय फार दिवसांच्या आशेचें फळ ह्मणूनच तें नांव त्यांस सुचलें. मुलगी सुमारें वर्ष दीड वर्षाची होईपर्यंत दोघां आईबापांना तिच्या कौतुकानें इतकें सुख झालें, कीं त्यांस त्या मुलीपलीकडे कांहीं सुद्धां कधीं दिसलें नाहीं. दिवसांच्या आठ प्रहरांपैकीं

त्यांचे सात प्रहर तरी त्या मुलीच्या लीलांनीं होणाऱ्या आनंदाचा अनुभव घेण्यांत जात असत. परंतु सारे दिवस सारखे नसतात, आणि काळाच्या मनांत काय असतें याची कल्पना कोणास कधींच होत नाहीं. या मुलीवर व आपल्यावर आजपासून तिसरे दिवशीं अमुक एक भयंकर अनर्थ गुदरणार आहे, असें जर कोणी बखतसिंगाला सांगितलें असतें, तर त्यास खरें तरी वाटलें असतें काय? मुळींच नाहीं. परंतु बिचाऱ्यावर तो प्रसंग येऊन गुदरला. त्याच्या प्रियपत्नीला एकाएकीं कांहीं विकार होऊन तिला मृत्यूनें आपल्या राज्यांत ओढून नेलें. बखतसिंगाच्या शोकास पारावार नाहींसा झाला. बिचाऱ्या आशावतीला कांहीं कळतच नव्हतें तेव्हां ती बाप शोक करीत असतां आईच्या प्रेताजवळ जाऊन तिला उठविण्यासाठीं तिचें अंग हालवूं व पदर ओढूं लागली. कितीही शोक झाला, तरी त्याला शेंवट आहेच बखतसिंगाला आपला शोक आटपून पुढच्या कृत्याला लागावें लागलें. तें सर्व आटपल्यावर तो बिचारा आशावतीवर आपल्या प्रेमाचा सगळा भर टाकून राहिला. त्याच्या आप्तइष्टमित्रांनीं त्याला पुष्कळ आग्रह केला, कीं तुह्मी दुसरा विवाह करा, परंतु त्यानें बिलकूल न ऐकतां आपलें सगळें प्रेम त्या पोरीवर एकवटून त्यानें तिचें पालनपोषण केलें.

आशावतीचें लावण्य अतिशय अनुपम होतें आणि ती दिवसांमासांनीं वाढत चालली तसतसें तें इतकें खुलत

चाकलें कीं, ती पांच सात वर्षांची झाली तेव्हांपासूनच लोक आपल्या मुलांसाठीं मागण्या घालूं लागले, परंतु कृपणाला जसा त्याच्या धनाचा ठेवा, त्याप्रमाणें बखत-सिंगाला ती त्याची मुलगी झाली. तो अहोरात्र तिच्या ठिकाणीं मग्न असे. आपल्याला हिला ह्मणजे कधीं कोणाला देऊन टाकावी लागेल, असें त्याच्या स्वप्नींसुद्धां आलें नाहीं. आणि कोणी तशी त्याच्याजवळ गोष्ट काढली, तर तो लागलीच "कायहो, तुम्हांला ती माझ्याजवळ सुखानें आहे हें पहावत नाहीं! पुनः माझ्याजवळ अशी गोष्ट काढूं नका." असें म्हणून वसकन् अंगावर येई. कोणीही त्याच्याकडे आला, कीं त्याला असें वाटे, कीं हा आपलें रत्न उपटून नेण्यास आला आहे. पुढें पुढें त्याला असें वाटूं लागलें, कीं आपल्या मुलीला न्यावी याखेरीज दुसरा कोणचासुद्धां हेतु कोणाच्या मनांत नाहीं. कद्रूला जसा त्याच्या पैशाचा, तसा त्या बखतसिंगाला आपल्या कन्यारत्नाचा अत्यंत लोभ जडला. पुढें आशावती चवदा पंधरा वर्षांची झाल्यावर, तिची आई त्याच वयांत दिसे तशी ती दिसूं लागल्यामुळें, त्याला त्याच्या पत्नीचें स्मरण होऊन आशावतीबद्दलचें प्रेम व तिच्या दर्शनानें होणारा आनंद हीं अगदीं परमावधीला गेलीं. तो तिच्या विवाहाचें नांवसुद्धां काढीना, आणि कोणी काढलें, तर त्याला खपेना, एक गोष्ट मात्र मोठी विलक्षण झाली होती, ती ही कीं, रजपुतांना अगदीं नैसर्गिक असा जो

गोषा त्यांत बखतसिंगानें कधीं आशावतीला ठेविलें नाहीं. याचें कारण केवळ येवढेंच कीं, आपण दुकानांत बसलों असतांनासुद्धां ती आपल्याजवळ असावी, आपल्यापासून ती दूर होऊं नये. शिवाय गरीबगुरीब लोकांत तितका गोषा बाळगण्याची शक्यताही नाहीं आणि कोणी बाळगीतही नाहीं, यामुळें त्याला कांहीं कोणी फारसें हंसलें नाहीं. तो केव्हां केव्हां आशावतीला दुकानावर बसवून बाहेरही जात असे.

आशावतीच्या लावण्याची सगळ्या गांवभर कीर्ति पसरली आणि अर्थातच पुष्कळ लोक तिला पाहण्यासाठीं म्हणून बखतसिंगाच्या दुकानावर येऊं लागले. तरुण रजपुतांची व मुसलमान सरदारांची गर्दी होऊं लागली आणि लोक बखतसिंगास नांवें ठेवूं लागले. परंतु बखतसिंगाचा आशावतीवर पूर्ण विश्वास असे. ती कधींही वाईट मार्गाला जायची नाहीं, हा त्याचा पूर्ण भरंवसा—आणि तिचा विवाह करून टाकावा हें तर त्याच्या मनांत मुळींसुद्धां येईना. तिच्या मनांत आपल्याविषयीं प्रेम आहे, त्याचा वांटेकरी दुसरा कोणी होऊं द्यावा ही नुसती कल्पना त्याला दुःसह होई. परंतु बापावर प्रेम असलें, म्हणजे मुलीचें दुसऱ्या कोणावर दुसऱ्या तऱ्हेनें प्रेम जाणार नाहीं हें थोडेंच शक्य होतें!

एका तरुण रजपुताचें चित्त आशावतीवर फार जडलें, आणि आशावतीला त्याच्याविषयीं प्रेम वाटूं लागलें. तो

तरुण रजपूत एकदां दोनदां बखतसिंगाच्या नजरेस पडला तेव्हां त्यास संशयही आला.

तिसरे खेपेस त्याला आपल्या दुकानाशीं पाहिला, तेव्हां तर त्यानें हा कोण आणखी इथें कां येतो ह्मणून संशयित मुद्रेनें विचारलेंही. आपलें चित्त या रजपुताकडे ओढतें असें स्पष्टपणें सांगण्याचा आशावतीस धीर होईना, आणि तिनें "कांहीं नाहीं, त्यानें आपल्या मालकाकरितां कांहीं माल खरेदी केला, तो दोनदां तीनदां मालकाला पसंत पडला नाहीं, यामुळें तो परत आणून देण्यास तो आला होता" असें सांगितलें.

आशावतीनें आपल्या बापास आजन्मांत लबाडी सांगितली, अशी हीच पहिली, आणि तिच्याबद्दल तिला पश्चात्तापही झाला, परंतु खरें सांगून टाकण्याचा धीर तिला होईना.

इकडे तो रजपूतही त्याच प्रकारचा बहाणा करून बाहेर पडला आणि कांहीं अंतरावर गेला, तों त्याला आणखी एक त्याच्याचसारखा पोषाख केलेला त्याचा स्नेही भेटला. त्याबरोबर पहिला एकदम ह्मणतो, "गड्या साधेलसं वाटतं रे वाटतं. किल्ला अगदींच हस्तगत होणार नाहीं असं मुळींच नाहीं. किल्ल्याचं मन आपल्याकडे आहे खास."

"खाविंद, त्याबद्दल मला मुळींच कधीं शंका नव्हती. आपलं स्वरूप आणखी आपलं बोलणं असंच मोहक आहे, कीं ...."

" पुरे. पुरे. उगीच रिकामी स्तुति करूं नको. कसंही करून ह्या आशावतीची आशा आपल्याला लागली आहे, ती सफळ व्हावी दुसरं कांहीं नाहीं. "

" होईल. होईल. किल्लेदारानं रत्न किती जरी साता किल्ल्यांत ठेवलं, तरी तें आपणच बाहेर पडायला लागलं तर रहायचं नाहीं. त्यांतून आपल्यासारखे अपहार करायला पाहणार. मग काय? सरकार, आपल्याला तें रत्न लाभणार.

ज्या रजपुताचें मन आशावतीवर गेलें होतें, तो राजपुत्र जहानगीर होय. गरीबाची कन्या आपण करतों ह्मटलें असतां बाप कबूल होणार नाहीं, हें जाणून त्यानें तिच्याशीं चोरून विवाह करून तिला आपल्या जनान्यांत आणून ठेवावी आणि मग तिच्या बापास कळवावें असें मनांत आणलें. तूं आपली मुलगी राजपुत्राला देतोस का असें सहजगत्या एकाकडून विचारवलें असतां बखतसिंगानें जे विलक्षण उद्गार काढले ते ऐकून त्यानें प्रत्यक्ष मागणी घालण्याचें नांवच टाकलें. आपण तिचें खोट्या वेषानें मन जिंकून तिच्याशीं विवाह करून जनान्यांत घेऊन जावें आणि मग याला कळवावें ह्मणजे त्याला कांहीं तितकें वावगें वाटणार नाहीं असा त्यानें विचार केला. जहानगीर खरोखरीच स्वरूपानें अतिशय उत्तम असे. त्यानें रजपूत वीराचा पोषाख करून बखतसिंगाच्या पश्चात् आशावतीस गांठून नानाप्रकारच्या शौर्यवीर्याच्या व प्रेमाच्या गोष्टी सांगून

तिचें मन जिंकलें. आणि आपल्यावर तिचें प्रेम खचित आहे असें कळल्यावर एके दिवशीं त्यानें आपण खरोखर कोण हेंही पण सांगितलें. तें आशावतीस प्रथमतः फार वाईट वाटलें. परंतु जहानगीरनें आपली आई कोण तें सांगितलें, व आणखी अनेक रजपूत कन्यांनीं मुसलमान वीरांस वरिलें असल्याचें सांगितलें, तेव्हां तिचें तरुण व निष्कपट मन तेव्हांच शांत झालें. आपण बादशहाच्या मुलाची राणी होणार याबद्दलच तिला अतोनात आनंद झाला. परंतु ही सर्व हकीगत बापाला कळवावयाची कशी ? ती मोठी पितृभक्त होती, परंतु प्रेमानें अंध झाल्यामुळें तिला असें वाटलें कीं, जर हें बापास सांगितलें, तर बाप त्याला अनुमोदन देणार नाहीं. तर होईल तितकें दिवस सांगूं नये हें बरें.

या सुमारास बखतसिंगास एकाएकीं लखनौस जाण्याचें कारण उत्पन्न झालें. कारण असें होतें, कीं गेल्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. आणि इकडे लेकीला एकटी टाकून जाणें तर केवळ त्याच्या जीवावर आलें पण करतो काय? काम जितक्या लवकर होईल तितक्या लवकर करून येतों असें सांगून व आपल्या स्वतःबद्दल अतिशय काळजी घेण्यासाठीं लेकीला बजावून तो लखनौस गेला.

इकडे जहानगीर रोज येऊन आशावतीला आग्रह करूं लागला, कीं "तूं मजबरोबर एके रात्रीं निघून चल. आपण चोरून लग्न करूं आणि बखतसिंग आला, ह्मणजे त्याला सर्व सांगूं. गोष्ट होऊन गेल्यावर कांहीं त्याला

त्याबद्दल इतकें वाईट वाटायचें नाहीं." पण प्रेमानें कितीही अंध झाली, तरी आशावती रजपूत कन्या होती. ती असल्या चौर्यविवाहाला मुळींच कबूल होईना; इतकेंच नव्हे, तर तिन्हीसांजा झाल्यानंतर कधीं तिनें त्याला आपल्या दुकानांत पाऊल घालूं दिलें नाहीं.

जहानगिराचें तर तिच्या ठिकाणीं अतिशय प्रेम. तेव्हां काय करावें तें त्यांस सुचेना. शेवटीं एके दिवशीं ऐन तिन्हीसांजा त्यानें धिटाईकरून आशावतीची गांठ घेतली आणि तिला आपल्याबरोबर पळून जाऊन लग्न लावून जनान्यांत राहण्याविषयीं आग्रह चालविला. परंतु तिनें त्याला निक्षून उत्तर दिलें, कीं "आपल्यावर माझें प्रेम आहे, तसें इतःपर कोणाही पुरुषावर जाणार नाहीं. पण पित्याच्या अनुमतीवांचून मी विवाहाला अनुकूळ होणार नाहीं. आजपर्यंत त्यांच्यापासून ही लपवालपवी केली याच्याबद्दल मला पश्चात्ताप होतो. केव्हां तरी त्यांना मी एकदां सांगणार."

"सांगणार? विवाह होण्याच्या आधीं सांगणार? आणखी इतर वेड्या कोपिष्ट रजपुतांप्रमाणें त्यानें तुझा प्राण घेतला तर?"

"घेतला, तरी मी त्यांना सांगणार."

"माझ्याबरोबर नाहीं येणार आज?"

"नाहीं. त्यांच्या संमतीवांचून मी आतां एक पाऊल पुढें टाकणार नाहीं."

हें बोलत असतां आशावतीच्या नेत्रांतून अश्रू वाहूं लागले. जहानगीरास भान राहिलें नाहीं आणि तिलाही भान राहिलें नाहीं. त्यानें पुढें होऊन तिला पोटाशीं धरलें.

परंतु आशावतीनें त्या मोहपाशांतून आपल्यास एकदम सोडवून ती दूर झाली. पुनः जहानगीरानें तिला विचारलें, तेव्हां तिनें आपलें पहिलेंच उत्तर दिलें, आणि त्यास तेथून जाण्याविषयीं विनविलें. नाइलाज होऊन तो गेला. परंतु तो घराच्या बाहेर पडून जाऊन आशावतीनें दरवाजा लावण्याला आणि बखतसिंग खांद्यावर पडशी टाकून दारांत येण्याला एकच गांठ पडली. बखतसिंगास त्यानें पाहिलें नाहीं पण बखतसिंगानें त्यास पाहिलें. अशा अपरात्रीं तरुण पुरुष आपल्या घरांतून बाहेर पडतांना पाहतांच त्याच्या तळपायाची आग मस्तकास गेली. त्यानें जोरानें दार खडखडावलें आणि आशावती दार उघडून बापाला पहातांच आनंदून हंसून "बाबा!" असा उद्गार काढून पुढें येतांच तो तिला ह्मणतो:—"दूर. दूर. कारटे. माझ्यापुढें—माझ्याजवळ येऊं नकोस. तूं माझ्या तोंडाला काळोखी लावलीस. बोल आतां घरांतून बाहेर गेला तो कोण? बोल."

आशावतीनें तें ऐकतांच लज्जा व खेद यांनीं तिला पूर्णपणें घेरलें. बाप येतांच झालेला सर्व प्रकार सांगावयाचा असा तिनें बेत केला होताच, पण तिच्या तोंडून शब्द निघेना.

पुनः बखतसिंगानें "बोल, कोण तो?" असें विचार

तांच "जहानगीर, तो माझ्याशीं विवाह करूं ह्मणतो आहे." असें तिनें एकदम त्यास सांगितलें. तिला वाटलें कीं राजपुत्राचें नांव ऐकतांच त्याचा क्रोध किंचित् शांत होईल, आणि मग आपण सर्व सांगूं. परंतु तें नांव ऐकतांच क्रोधानें त्याचें देहभान गेलें. "काय? माझ्या पोरीला मुसलमान भ्रष्ट करून गेला? कारटे, तुझी आई मेली त्याच्या ऐवजीं तूं कां नाहीं मेलीस? माझ्या पोरीशीं तो लग्न करणार? आणखी तूं भ्रष्ट होणार? मी जयपूरचा राजा नाहीं. पोरी तूं आतां मला मुकलीस."

असें ह्मणून त्यानें ताड्कन् आपली पडशी खालीं टाकून तींतून एक कुपी काढून तो पुढें झाला. आणि दोनही हातांनीं तिचा गळा दाबून धरून तिला ह्मणतो 'पोरी हें जहर पी. नाहीं तर नरडें दाबून मारीन. तूं त्याचें नांव इतक्या शांतपणानें घेतलेंस, आणखी त्याला दार उघडून देऊन प्रेमानें बोलून निरोप दिलास, त्या अर्थीं तुझ्या मनानें तरी पाप केलेंच आहे. तुझें मन भ्रष्ट झालेंच आहे. अशी भ्रष्ट तूं एक क्षणभर सुद्धां माझ्या दृष्टीसमोर नकोस. पी—पी—नाहीं तर नरडें दाबून खचित मारीन."

आशावतीही रजपूत कन्याच. पित्याचा विश्वासघात केल्याबद्दल तिला अत्यंत पश्चात्ताप झाला. आणि त्याचें प्रायश्चित्त देहांतच पाहिजे असें मनांत ह्मणून तिनें तें जहर घेतलें व पांच मिनिटांत प्राण सोडला.

दुसरे दिवशीं बखतसिंगही कोणीकडे नाहींसा झाला.